# प्रकरण तीन

## महिला व बालकल्याण विभाग

**3.851 3% अपंग कल्याण योजना - महिला व बालकांना साहित्य पुरविणे (घरघंटी)**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** या बाबत प्रमाणक क्रमांक 375, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 9,53,700/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 चे परिशिष्ट सात मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी समितीच्या इतिवृत्तात बाजारातील दुकानदारांचे बाजार भाव तीन दर नमुद केलेले आहेत. अनुक्रमे (1) मे.दिनेश एन्टरप्रायजेस, कल्याण चे रुपये 22,500/- प्रती नग (2) मे.युनिव्हर्स ट्रेडींग कंपनी चे रुपये 20,496/- प्रती नग (3) मे.मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज कल्याण चे रुपये 20,300/- प्रती नग सदरचे दर बाजारभावाप्रमाणे असल्याबाबत स्पष्ट होत नाही.

2) सन 2015-2016 मध्ये खरेदी समितीच्या मान्यतेने 51 नग घरघंटीसाठी रुपये 18,700/- प्रती नग (वाटाघाटी नंतर) असे एकुण 51 नग पुरवठा आदेश देण्यात आला आहे. याप्रमाणे दर देतांना खरेदी समितीची बैठकीचे इतिवृत्त संचिकेत आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/ उदयोग-6, दिनांक 02/01/1992, अनुक्रमांक 8.2 व परिशिष्ट सहा मध्ये नमूद केल्याप्रमाणे लॅटीन आयोगाच्या शिफारशी नुसार खरेदी समितीत सर्व सभासदांनी बैठकीपुर्वी प्रतिज्ञापत्र दयावयाचे आहे. सदर खरेदी संचिकेची तपासणी केली असता, सदर प्रतिज्ञापत्र संचिकेत संलग्न नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट-ई मध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. साहित्य पुरवठा दिनांक 23/03/2016 रोजी साहित्याचे वाटप शहापूर-12, डोळखांब-05, मुरबाङ-1, 01, मुरबाङ-2, 04, कल्याण-07, अंबरनाथ-01, भिवंडी-1 14, भिवंडी-2, 2 अशी वाटप करण्यात आली आहे. परंतु सदर साहित्य हे लाभार्थ्यांना वाटप केल्याचे संचिकेत दिसून येत नाही. सदर सहित्य वाटप झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

**3.852 अनुसुचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ ए.बी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद शासकीय निधीतुन अनुसुचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ ए.बी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना सन 2015-2016 या वित्तीय वर्षात राबविण्यात आली असुन सदरबाबत रक्कम रूपये 1,52,91,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, अदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक बीपुडी 2015/प्र.क्र.8/का-6 (1), दिनांक 17/04/2015 अन्वये टि.एस.पी. क्षेत्राकरिता अनुदान उपल्बध करुन दिलेले असताना व महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 अन्वये अनुसुचित विभागातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी अनुदान उपलब्ध करण्यात आलेले होते. OTSP व TSP व डॉ अब्दुल कलाम अमृत आहार योजना अशा योजनाचा निधी प्राप्त झालेले असताना सन 2015-2016 मध्ये योग्य नियोजन न केल्यामुळे सदरचा निधी खर्च झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यात कुपोषणाचे अनेक बळी झाल्याचे नाकारता येत नाही. तरी हया गंभीर अनियमिततेबाबत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8 दिनांक 18/11/2015 अन्वये अनुसुचित विभागातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना दिनांक 01/12/2015 पासुन लागु करण्यात आल्या असुन आयुक्तालय एकात्मीक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांचे पत्र जावक क्रमांक एबाविसयो/ अ.से.ग.स्त.मा./ भा.र.डॉ.ए.पी.जे.क./अनुदान/3436 /2015-2016, दिनांक 11/12/ 2015 अन्वये पालघर साठी रुपये 1,12,91,000/- एवढे अनुदान उपल्बध करुन देण्यात आलेले असताना सदरची योजना माहे डिसेंबर पासुन नमुद केलेल्या ठिकाणी का राबविण्यात आली नाही? या गंभीर अनियमतेबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 मधील बाब क्रमांक 3.2 नुसार योजनेचे वेळोवेळी त्रयस्त संस्थेमार्फत मुल्यामापन करण्यात आल्याचे आढळुन आलेले नाही. त्यामुळे सदरची योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर शासन आदेशातील बाब क्रमांक 3.3 नुसार योजनाचा कामाबाबत व फलनिष्पत्तीचा आढावा घेण्यात आलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 नुसार योजनेचे स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, इत्यादी मार्फत सामुदायीक संनियत्रण (Community Based Monitoring) करण्यात आलेले नाही. तसे न करण्याचे प्रयोजन काय?

5) महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग शासन निर्णय क्रमांक बीडायु 2015 /प्र.क्र.10/कार्यासन 6, दिनांक 05/05/2015 अन्वये 2236 पोषण आहार टि.एस.पी. अंतर्गत रूपये 4,00,000/- अनुदान उपलब्ध असताना व सदरचे अनुदान कोषागारातुन वितरीत करण्यात आलेले असताना सदरचा निधी सन 2015-2016 मध्ये खर्च होणे अपेक्षित असताना सदरचा निधी त्या वित्तीय वर्षात गटस्तरावर वर्षाअखेरीस अनुदान वर्ग करण्यात येऊॅन सदरचा निधी मात्र सन 2015-2016 मध्ये खर्च करण्यात आलेला नाही. जिल्हयात कुपोषणाचा विषय गंभीर असताना एकात्मीक बालविकास विभाग, पालघर ने सदरची योजना गांभिर्याने घेतली नाही. त्यामुळे सन 2015-2016 मधील अनुसुचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेपासून पालघर 115 , मनोर 269, डाहाणु 202, कासा 150, असे एकुण 770 वंचित राहिल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर व जन्माला येणा-या बाळावर होऊन बाळ कुपोषीत जन्माला आल्याचे नाकारता येत नाही.

**3.853 90 टक्के अनुदानावर माहिलांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत शिलाई मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,33,790 खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उघोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2004/प्र.क्र.82/ भाग 4, उघोग-4, दिनांक 30/10/2015 नुसार मधील 4.4.1.1 च्या सुचनेनुसार निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही. पुर्व अर्हता तांत्रिक प्रस्तवात खालील उणीवा ई - निवेदेच्या अटी शर्ती बाब क्रमांक 10 नुसार तपासणी फी जिल्हा परिषदेकडे जमा न केल्यास सदरची निविदा उघडण्यात येणार नाहीत. पाकीट क्रमांक 1 मध्ये आवश्यक बाबीत (1) बयाणा रक्कम रूपये 50,000/- (2) को-या निवेदेची फार्म फी रूपये 3,000/- (3) व प्रयोग शाळा फी रुपये 10,000/- इत्यादी Online भरण्यात यावीत. तसेच बयाण रक्कम को-या निविदा फॉर्म फी व प्रयोगशाळा तपासणी फी ची रक्कम NEFT द्वारे भरल्याबाबतचे संस्थाच्या लेटर हेडवरील प्रमाणपत्र अपलोड करण्यात यावे व ISI प्रमाणपत्र जोडण्यात यावे. अशा अटी असताना मे. हुसेन ट्रेडर्स, जव्हार यांनी सदर निवेदेतील अटींची पुर्तता केलेली नसताना लिफाफा क्रमांक 1 मधील पुर्तता होत नसताना वाणिज्यिक प्रस्ताव कसा स्विकारण्यात आला? याचा खुलासा करावा.

2) सदर विभागाने निविदा सुचना E tender क्रमांक 2 (सन 2015-2016) साठी online निविदा फुल शटल शिलाई मशिन पुरविणे (आयएसआय प्रमाणित) सदर निविदा Online download व Online submission पध्दतीने स्वीकारण्यात येतील, असे नमुद असुन सदर निविदा कोणत्या दिनांकास स्विकारण्यात येतील? त्यांचा सुरवातीचा दिनांक व समाप्तीचा दिनांक नमुद न करता मोघम निविदा देण्यात आलेल्या आहेत.

3) माहिला व बाल विकास अधिकारी यांनी स्पेसिफिकेशन साहित्याचे नाव व तपशिलामध्ये (Full Shattal) शिवणयंत्र (पायाने चालविणे) आय.एस.आय. प्रमाणित उत्पादन पुरविणे हया पध्दतीने मागणीचे शिवणयंत्र पुरविण्याबाबत निविदा होती. त्यानुसार हुसेन ट्रेडर्स, जव्हार यांनी ही निविदा सादर केलेली असुन सदर निविदा दराची निगोसिएशन करुन रूपये 8,950/- हया दराची निविदा मंजुर करुन हुसेन ट्रेडर्स, जव्हार यांना देण्यात आली . सदर निविदा सादर करताना हुसेन ट्रेडर्स, जव्हार यांनी सादर केलेल्या निविदेत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना पुरवठा केलेल्या आदेशाची प्रत जोडलेली आहे. त्या आदेशात हुसेन ट्रेडर्स, जव्हार यांनी पुजा कंपनीचे / नामांकित कंपनीची फुल शेटल शिलाई (ISI) मार्क असलेली पुरवठा केली असुन ती रूपये 6,940/- या दराने पुरवठा केलेली आहे. सदरचे दर हे दिनांक 31/03/2016 पर्यंत अनुज्ञेय राहतील, असे नमुद केलेले आहे. ज्या मापदंडात जिल्हा परिषदने मागणी केलेली आहे, त्याच मापदंडात अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांची ही असताना सदर मक्तेदाराशी वाटाघाटी करताना सदर दर का विचारात घेण्यात आले नाही? यांचा खुलासा करावा. सदर दर विचारात न घेतल्यामुळे ज्यादा प्रदान करण्यात आलेले प्रत्येक मशिन मागे रूपये 2010x178=3,57,780/- एवढे ज्यादा प्रदान झालेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदचे निधीचे अर्थिक नुकसान झाल्याचे नाकरता येत नाही. तसेच काही लाभार्थी हे सदर लाभापासुन वंचित राहील्याचे नाकारता येत नाही.

4) हुसेन ट्रेडर्स, जव्हार हे Usha कंपनीचे अधिकृत पुरवठादार हे this valid up to दिनांक 31/12/2015 असताना साहित्य पुरवठा आदेश हे दिनांक 23/03/2016 रोजीचे आहेत म्हणजे अधिकृत पुरवठादार कालावधी समाप्त झाल्यावर पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/ प्र.क्र.76/ पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील 16 नुसार सदर योजना राबविण्यात आलेली असुन त्या मधील अटी व शर्ती नुसार दारिद्रय रेषेखालील महिलांना लाभ देण्यात यावा. दारिद्रय रेषेखालील महिला पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास रूपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थीना महिला व बाल कल्याण समितीच्या मान्येतेने या योजनेचा लाभ देण्यात यावा. असे असताना काही लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील नाहीत व रूपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या नाहीत, अशा लाभार्थीना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तरी संबंधीत निवड समितीकडुन अपात्र लाभार्थ्यांना प्रदान झालेली रक्कम वसुल करण्यात यावी.

6) महाराष्ट्र शासन, उघोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2004/प्र.क्र.82/भाग 4 उघोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.1.1.2 नुसार प्रशासकीय मान्यता वित्त विभागाकडुन कोणत्याही प्रकारच्या खरेदी देयकांची रक्कम 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येवु नये. तसेच विभागाने आवश्यक त्या वस्तुची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पुर्वीच होईल, अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवावी असे असताना उपरोक्त आदेशान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

7) महाराष्ट्र शासन, उघोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2004/प्र.क्र.82/ भाग 4 उघोग 4, दिनांक 30/10/2015 मधील खरेदीची तत्वे नियम क्रमांक 2.6 नुसार करण्यात आलेले नाही.

8) महाराष्ट्र शासन, उघोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2004/प्र.क्र.82/ भाग 4 उघोग4, दिनांक 30/10/2015 मधील 4.1 नुसार खुल्या निविदेसाठी निविदेचे प्रकाशन वर्तमानपत्राच्या माध्यमातुन करण्यात आल्याचे सदर नस्तीत आढळुन आलेले नाही. ( वृत्तपत्र जोडण्यात आलेले नाही )

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय परास/1089//646/266/3 दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रृती अहवाल व मुल्यमापन पडताळणी न केल्याने योजनेचा उददेश सफल झाला किंवा नाही? यांची पडताळणी केलेली लेखापरिक्षणास आढळुन आलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक zpa2008/ प्र.क्र.446/ वित्त 9/ मुंबई दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सुचनांनुसार लाभाच्या योजना राबविताना वेळापत्रकांनुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय मागास1093/ प्र.क्र.1239/ 34 दिनांक 01/09/1993 अन्वये साहित्य खरेदी ज्या आर्थिक वर्षात झाली, त्या आर्थिक वर्षात वाटप होणे बंधनकारक

आहे. याची पडळताणी करण्यासाठी गटस्तराकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याची पडताळणी लेखापरिक्षकांस करता आलेली नाही.

**3.854 अंगणवाडी साहित्य पुरविणे (प्रोजेक्टर).**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** महिला व बाल कल्याण विभागाने यांनी 88 नग प्रोजेक्टर प्रती नग रुपये 34,065/- प्रमाणे एकूण रुपये 29,97,720/- ची खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार खर्चाच्या मर्यादेचे प्रशासकीय मंजुरीचे अधिकार वरील योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत महिला व बाल कल्याण विषय समिती सभापती यांना असताना त्याप्रमाणे त्यांची मंजुरी घेतलेली नाही.

2) महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी वरील साहित्य खरेदी करण्यापूर्वी गटांकडून मागणी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी गटाकडून प्राप्त झाल्याचे लेखे नस्तीसोबत नाहीत.

3) वरील साहित्याबाबत केंद्र शासनाने मे.रिको इंडिया प्रा.लि. यांच्याशी दर करार केलेला आहे. त्यामुळे त्यांच्याच नावे पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना अनोंदणीकृत पुरवठादारांना पुरवठा आदेश दिलेला आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

4) पुरवठा केलेल्या साहित्याची पोहचपावती दोन प्रती महिला व बाल कल्याण अधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक होते. असे असून देखील त्याप्रमाणे पोच पावत्या नस्तीसोबत नाहीत. त्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 15/05/2017 नुसार तात्काळ उपलब्ध कराव्यात व खुलासा सादर करावा. परंतु, महिला व बाल कल्याण विभागाने पोच पावत्या उपलब्ध केलेल्या नाहीत व खुलासा सादर केलेला नाही.

5) पुरवठादाराने साहित्याचा नमुना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अलिबाग येथे घेऊन जाणे व त्याचा स्पेसिफिकेशनप्रमाणे तपासणी अहवाल विभागाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, अशा प्रकारे तपासणी अहवाल नस्तीसोबत उपलब्ध नाही. असे असताना देखील महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

6) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार प्रोजेक्टर पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून दिनांक 31/03/2016 पूर्वी करण्यात यावा, अशी अट होती. परंतु, गटांकडील साठा नोंदवही तसेच डिलीवरी चलने उपलब्ध न केल्यामुळे पुरवठादराने 88 नग प्रोजेक्टर गटाकडे सदर मुदतीत वाटप केल्याची खात्री करता आली नाही. तरी या बाबत सखोल चौकशी करून पुरवठा केलेल्या 88 प्रोजेक्टर विहित मुदतीत प्राप्त झाल्याची पूर्तता दाखवावी.

7) निविदाकाराकडून पुरवठा झालेल्या 88 प्रोजेक्टरची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम अदा करावी, असे निर्देश असतानासुद्धा विभागाने गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी न करताच तद्पुर्वीच रक्कम अदा केलेली आहे. वरील सर्व बाबींवरून असे दिसून येते की, शासन निर्णयांचा विचार न करता नियमबाह्यपणे सदर योजनेवर खर्च केलेला आहे.

8) पुरवठा आदेश क्रमांक 518, दिनांक 30/03/2016 नुसार 88 प्रोजेक्टर मशीन पुरवठा आदेश दिलेला आहे. परंतु, पुरवठादार मे.रिको इंडिया लिमिटेड, दिल्ली हे केंद्र शासनाच्या दरकरारावरील निविदाकार आहेत. सदर निविदाकाराचा दर करार पुरवठा कालावधी दिनांक 06/04/2015 ते दिनांक 22/01/2016 असा होता. तसेच सदर निविदाकाराला केंद्रशासनाने मुदतवाढ दिल्याचे कोणतेही लेखे नस्तीसोबत नाहीत. असे असताना देखील नियमबाह्यपणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

**3.855 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 21,46,800/- खर्च करण्यात आला आहे. महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणावेळी सदर नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/ पं.रा.1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 5 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार योजना राबविण्यात आली आहे.

2) सदर योजनेसाठी महिला बालकल्याण समितीने ठराव क्रमांक 295, दिनांक 11/01/2016 ने मंजूरी दिलेली आहे.

3) सदर योजनेसाठी एकूण लाभार्थी संख्या 618 मंजूर असून लाभार्थी निवड यादीसोबत त्यांची कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत.

4) सदर योजनेतील 108 लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रुपये 3,350/- प्रमाणे लाभ देण्यात आला आहे. तर 510 लाभार्थ्यांना रुपये 3,500/- प्रमाणे प्रशिक्षण शुल्क संबंधीत संस्थेला अदा करण्यात आलेले आहे. याबाबत खुलासा करावा.

5) सदर लाभार्थी प्रशिक्षण पूर्ण करुन पास झालेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीसोबत संपूर्ण लाभार्थ्यांचे जोडलेले नाही.

**3.856 इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकल पुरविणे**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 579, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 19,97,601/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 अन्वये एकूण 449 नग सायकली बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे तालुकानिहाय पोहोच करून माल सुस्थितीत व निविदेतील वर्णनाप्रमाणे पुरविलेबाबत पोहोच पावत्या व डिलेव्हरी चलन सादर न करताच देयक पारित करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

प्रथम 90 टक्के बिलाची रक्कम प्रदान करून त्यानंतर तालुका स्तरावर प्राप्त साहित्यातील काही नमुने आय.टी.आय. कडून तपासून घेतल्यानंतर उर्वरित देयकाची 10 टक्के रक्कम द्यावयाची असतांना तशी कार्यवाही का करण्यात आलेली नाही?

2) सदरील निविदेतील अट क्रमांक 15 अन्वये खालील आवश्यक कागदपत्रांची मागणी केलेली आहे.

अ) आय.एस.टी. प्रमाणित साहित्याचे भारतीय मानक ब्युरोकडील प्रमाणपत्र

ब) विक्री पश्चात सेवा उपलब्धतेबाबत रत्नागिरी जिल्हातील अधिकृत सेवा केंद्रांची यादी संबधित व्यक्तीचे नाव, पूर्ण पत्ता व फोन नंबर सह जोडावी.

क) सदरील लेडीज सायकल दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे तंतोतंत असल्याचे कोणत्याही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / संस्थेचा पूर्ण तपासणी अहवाल.

ड) निविदेनुसार पुरवठा करावयाचे साहित्य पुरेसे उपलब्ध असल्याबाबतचे निविदाधाराकाचे निविदेसोबत जोडावे.

इ) लेडीज सायकल तयार करणाऱ्या सायकल कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे कंपनीकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र त्याचप्रमाणे ज्या कंपनीचे विक्रेते आहात, त्या कंपनीची संपूर्ण माहिती.

फ) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अंतर्गत दुकान नोंदणी प्रमाणपत्र व उत्पादक असल्यास उत्पनाचा परवाना.

उपरोक्तप्रमाणे सर्व अभिलेखे आवश्यक असतांना संबधित मक्तेदाराने घरघंटी (पिठाची चक्की) बाबतची सर्व अभिलेखे सादर केलेली असतांना संबधितास मक्ता देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. संबधित मक्तेदार हा कोहिनूर कंपनीची लेडीज सायकल पुरविण्यास पात्र नसतानाही त्याची निवड केलेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/31/2239/सी. आर/1094, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 नुसार विहित नमुन्यात गावनिहाय, योजनानिहाय मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकल वाटप करणे या योजनेतील लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासले असता रत्नागिरी प्रकल्प 1 व रत्नागिरी प्रकल्प 2 यांचे कडून 92 लाभार्थी निवडण्यात आलेले आहेत. तथापि, उपरोक्त 92 लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांनी प्रशासकीय मंजुरी आदेशातील अटीनुसार लाभार्थ्यांचे उत्पन्न वार्षिक रक्कम रुपये 50,000/- पर्यंत असल्याबाबत तहसीलदार, तलाठी, विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी उत्पनाचा दाखला जोडलेला आहे. असे असतांना उर्वरित लाभार्थी पात्र करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे व उर्वरित लाभार्थ्यांचे उत्पन्न रक्कम रुपये 50,000/- च्या आत असल्याची खात्री पटवावी. तसेच मंजूर लाभार्थी यादी अनुक्रमांक 31 धनश्री संदीप आग्रे व अनुक्रमांक 32 श्रुतिका संदीप आग्रे हया एकाच घरातील लाभार्थी मंजूर एकाच लाभार्थ्याला लाभ मंजूर असल्याने एका लाभार्थ्याची रक्कम रुपये 4,449/- वसूल करून जिल्हा परिषद खाती जमा करण्यात यावी.

6) सदरील योजनेसाठी मंजूर केलेल्या लाभार्थ्यांपैकी मंडणगड, दाभोळ, खेड, लांजा व राजापूर तालुक्यातील लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. लांजा तालुक्यातील मंजूर यादी अनुक्रमांक 5, प्राची संतोष सावंत व अनुक्रमांक 6, शिल्पा संतोष सावंत, राजापूर तालुका यादीतील अनुक्रमांक 23, स्नेहल काशिनाथ मोरे व अनुक्रमांक 24, स्नेजल काशिनाथ मोरे, अनुक्रमांक 93, अंजली कृष्णकांत कुंडेकर व अनुक्रमांक 94, अमिषा कृष्णकांत कुंडेकर या एकाच घरातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याने एकूण तीन लाभार्थ्यांची रक्कम रुपये 13,347/- संबधित लाभार्थ्याकडून वसूल करून जिल्हा परिषद खाती जमा करण्यात यावी.

7) संबधित लाभार्थ्यांना साहित्य प्राप्त झाल्याबाबतच्या पोहोच लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

**3.857 पिको फॉल व शिलाई मशिन अखर्चित रकमेबाबत**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग अधिनस्त महिला बाल कल्याण विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतेवेळी जिल्हा परिषदेने स्वनिधी अंतर्गत राबवावयाच्या योजना व त्यासाठी तरतूद केलेल्या निधीचे अवलोकन केले असता मंजुर योजनामध्ये जिल्हा परिषदेने महिलांना पिको फॉल व शिलाई मशिन पुरविणे ही योजना मंजुर करुन घेतली. सदर योजनेसाठी अंदाजपत्रकात रक्कम रूपये 8,00,000/- ची भरीव तरतूद केली. त्या अनुषंगाने पडताळणी केली असता या वित्तीय वर्षात या योजनेवर संबधित विभागाने खर्च न करता निधी तसाच अखर्चित ठेवला. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असून त्यामुळे सदर योजनेसाठी जिल्हयातील लाभार्थी वंचित राहिले. खर्च का करण्यात आला नाही?

**3.858 विशेष घटक योजनेअंतर्गत पिठाची गिरणी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर योजनेवर रक्कम रूपये 1,89,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजूर यादीत नमूद लाभार्थ्यांपैकी खालील नमूद व्यक्तींचे प्रस्ताव, प्रस्ताव नस्तीत आढळून आले नाहीत. प्रस्ताव नसताना लाभार्थीला लाभ देणे ही गंभिर बाब आहे. परिणामी केलेला खर्च रक्कम रूपये 25,200/- लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

i) श्रीम. ज्योती दिपक जाधव, गांव वारगांव तालुका कणकवली.

ii) श्रीम. दिपाली दशरथ कोचरेकर, गांव कोचरे तालुका वेंगुर्ला

2) लाभार्थी अर्जातील अट क्रमांक 7 नुसार अर्जदाराच्या वाडीत घरघंटी किंवा पिठाची गिरणी नसलेबाबत ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांच्या सहीचा दाखला असणे आवश्यक, असे नमूद असतांना खालील नमूद चार

लाभार्थी हे एकाच वाडीतील असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर अट क्रमांक 7 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी प्रस्तावासाठी आवश्यक असलेल्या अटी शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही असे दिसून येते.

I) श्रीम. स्वप्नाली चंदु वळंजु वळीवंडे, तालुका देवगड.

II) श्रीम. वंदिता विश्वजित वळंजू वळीवंडे, तालुका देवगड.

III) श्रीम. सुरेखा रामदास शिरगांवकर शिरगांव, तालुका देवगड.

IV) श्रीम. रोशनी रमांकात शिरगांवकर शिरगांव, तालुका देवगङ

**3.859 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण योजना.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद महिला बाल कल्याण विभागामार्फत सन 2015-2016 या वित्तीय वर्षात इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना शासकिय व निमशासकिय नोकरीसाठी एम.एस. सी. आय. टी प्रशिक्षण अनिवार्य असल्याने संगणक बाबतचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्यासाठी जिल्हयातून एकूण 08 प्रकल्पांमार्फत 512 लाभार्थीचे अनुदान प्रत्येकी रूपये 3,350/- प्रमाणे तालुकास्तरावर वितरीत करण्यात आलेली आहे. वितरीत केलेली रक्कम रूपये 11,69,150/- + रूपये 5,46,050/- एकूण रूपये 17,15,200/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थाचे मूळ प्रस्ताव लेखा परिक्षणात उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे सर्व अटी शर्थीची पूर्तता केलेल्याच मुलींना संगणक प्रशिक्षण दिलेबाबतची खात्री लेखापरिक्षणास करता आलेली नाही.

2) संस्थेने प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणार्थीचा हजेरीपट उपलब्ध झाला नाही.

3) सदरचे प्रशिक्षणार्थी 512 लाभार्थापैकी किती प्रशिक्षणार्थी पास झाले किंवा परिक्षेस गैरहजर होते ? याबाबत संबधित संस्था चालकाने लाभार्थ्यांचा परिक्षेच्या उपस्थितीसह प्रशिक्षणार्थीची नाव परिक्षा क्रमांक व गुणपत्रीकेसह माहिती जिल्हा पातळीवर उपलब्ध नाही.

**3.860 आयर्न सिरप बाबतच्या अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,39,886/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पोच पावत्या नसलेबाबत उपरोक्त आदेशान्वये संबंधित आठ तालुक्याच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मीक बाल विकास योजना यांचेकडे आयर्न सिरप बॉटल प्राप्त झाल्याचा पोचपावत्या लेखापरिक्षणाचे वेळी सादर करण्यात आलेल्या नाहीत.

2) करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार (1) कुडाळ आणि सावंतवाडी गटाकडील साठा नोंदवहयांची पडताळणी केली असता आयर्न सिरप प्राप्त झाल्याचा नोंदी आढळून आल्या नाहीत. त्यामुळे आयर्न सिरप बॉटल वाटप झाले किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही. (2) वैभववाडी गटाकडील महिला व बाल विकास विभागाच्या साठा नोंदवहीची पडताळणी केली असता आयर्न सिरपच्या नोंदीमध्ये पुरवठा आदेश क्रमांक व संख्या नमूद करणेत आलेली नाही.

3) आयर्न सिरप बॉटल खरेदी बाबतच्या करारनाम्याची पडताळणी केली असता करारनामापत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची स्वाक्षरी नाही.

**3.861 जिल्हा परिषद सेस, विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना यासाठी अर्थ संकल्पात तरतूद करूनही योजना न राबविलेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए2013/प्र.क्र 76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील योजना गट-अ नुसार सन 2015-2016 या

वित्तीय वर्षासाठी, जिल्हा परिषदसेस, आदिवासी उपयोजना विशेष घटक योजना यासाठी अर्थ संकल्पात तरतूद करूनही योजना राबविण्यात आल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांनी सन 2015-2016 जिल्हा परिषद सेस, आदिवासी उपयोजना, विशेष घटक योजनासाठी अर्थसंकल्पात वरीलप्रमाणे तरतूद करून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील योजना गट-अ व गट ब नुसार सन 2015-2016 या वित्तीय वर्षासाठी योजनेची अंमलबजावणी केली नाही.

2) उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मोठया प्रमाणात अनुदान अखर्चित राहिलेले आहे. त्यामुळे ग्रामिण जनतेस अनुदानाचे लाभा पासुन वंचित राहावे लागले आहे. वेळीच मंजूर अनुदानानुसार खर्चाचे योग्य नियोजन केले असते तर एवढया मोठया प्रमाणात अनुदान शिल्लक राहिले नसते. आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध असतांनाही अयोग्य नियोजनामुळे शासन धोरणांची अंमलबजावणी योग्य केली जात नसलेचे दिसुन येते.

**3.862 महिला व बालविकास विभागाच्या अनुशेषाबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या 10 टक्के अनुदान महिला व बालकल्याण योजनासाठी खर्च करणे आवश्यक आहे. ग्रामविकास खात्याच्या शासन निर्णय क्रमांक झेडपीए-10/2001/प्र.क्र.2006/05 दिनांक 06/11/2001 अन्वये महिलांच्या विकासासंदर्भात धोरण जाहीर केलेले असुन सदर धोरणाप्रमाणे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नापैकी 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणचा अनुशेष सन 2002-2003 ते 2015-2016 चा रक्कम रुपये 79,52,863/- आहे. याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

महिला व बाल कल्याण विभागाने पुरविलेल्या तक्त्यानुसार सन 2002-2003 ते 2015-2016 पर्यंत महिला व बालकल्याण विभागाचा रुपये 79,52,863/- इतका अनुशेष नमुद केलेला आहे. शासन निर्णय दिनांक 06/11/2001 नुसार जिल्हा परिषद सेस निधीच्या 10 टक्के खर्च महिला व बाल विकास योजनांसाठी खर्च करणे आवश्यक आहे. तरी अनुशेष निकाली काढणे बाबत विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.863 जिल्हा परिषद सेस फंडातील सन 2015-16 या आर्थिक वर्षात ग्रामिण भागातील मुलींना संगणक दुरुस्ती प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,47,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालविकास विभागाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे,शिरपुर, शिंदखेडा व साक्री येथील स्थानिक किमान कौशल्य व शासकीय तंत्रनिकेतन, व्होकेशनल ट्रेनिंग प्रोग्राम देणाऱ्या संस्था यांचेकडे प्रशिक्षण घेणेबाबत व त्या संस्थेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही अथवा इतर कोणत्याही संस्थेचे दर मागविण्यात आलेले नाही. SKILL DEVELOPMENT SCHEME अंतर्गत Director General of Employment and Training या संस्थेमध्ये धुळे येथे 5 संस्था मान्यता प्राप्त असतांना त्यांचेकडील दर न मागविता इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन शिरपुर, धुळे या एकाच संस्थेचे दर मागविण्यात आलेले आहे व त्यांना कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. शासन निर्णय 02/01/1992 चे पालन न करणे ही बाब गंभीर वित्तीय अनियमिता आहे.

2) इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन शिरपुर, धुळे यांनी रुपये 5,000/- दर नमुद केलेले आहेत. त्यापैकी रुपये 4,500/- जिल्हा परिषदेमार्फत व रुपये 500/- लाभार्थी स्वत: संस्थेकडे जमा केलेले आहेत. लाभार्थी हिस्सा जिल्हा परिषदेच्या लेख्यात समाविष्ट नाही. इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन हे व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायटर, शिरपुर, धुळे येथे आहे. त्या संस्थेच्या जिल्हयात इतर ठिकाणी संस्था नाहीत. जिल्हा परिषदेने निवडलेले लाभार्थी हे साक्री व शिरपुर तालुक्यातील आहेत. त्यामुळे इतर तालुक्यातील लाभार्थी कोठे व कसे प्रशिक्षण दिलेले आहे? याबाबत सबळ अभिलेख पंचायतीच्या दफ्तरी आढळुन आलेले नाही. विद्यार्थ्यांनी तालुक्यात कोणत्या केंद्रात प्रशिक्षण घेतलेले आहे? याबाबत विद्यार्थांची दररोज सही घेण्यात आलेली नाही. हजेरी पटावर प्राचार्य यांच्या सहया नाहीत. धुळे, शिंदखेडा व

साक्री येथील बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षणास भेटी दिल्याबाबत भेट अहवालाच्या अभिलेख उपलब्ध नाहीत. धुळे, शिंदखेडा व साक्री येथील लाभार्थ्यांनी कोठे व कसे प्रशिक्षण घेतले? याबाबत समर्पक अभिलेख नाहीत. करारपत्रानुसार धुळे, शिंदखेडा व साक्री येथे कोठे व कसे प्रशिक्षण आयोजीत करण्यात येईल? याबाबत उल्लेख करार पत्रात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा योग्य लाभ देण्यात आलेला आहे हे अभिलेख्यावरुन दिसुन येत नाही. महिला व बालविकास विभागाने आगाऊ रक्कम संस्थेला दिलेली आहे.

3) सर्व जिल्हयातील लाभार्थ्यांना शिरपुर येथे प्रशिक्षणास पाठविण्यात आलेले आहे व विहीत निविदा पध्दत वापरण्यात आलेली नाही. त्यामुळे पुरवठा धारकाचे हित जोपासण्यात आलेले आहे, असे सकृत दर्शनी दिसुन येत आहे.

4) एसडीआयएस यांचे दि. 07/01/2014 च्या पत्रानुसार संगणक दुरुस्ती कोर्स साठी आयसीटी-205 180 तासाचा कोर्स नमुद असुन रुपये 800/- फी आहे. प्रति तास 27.50 रुपये या दराने 150 तासाच्या कोर्ससाठी 4,125/- इतकी फी असतांना इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन शिरपुर यांनी 300 तासाच्या कोर्ससाठी रुपये 5,000/- दर नमुद केलेला आहे. मुळ कोर्स 150 तासाचा असतांना 300 तासाचा दर स्विकारण्यात आलेला आहे. सबब कोर्स मॉडयुल व देण्यात आलेली फी योग्य आहे. याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे तास वाढवुन कोर्स मॉडयुल पेक्षा जादा फी अदा केलेली आहे असे दिसुन येते. संस्थेचे दर कोणत्या निकषावर तपासण्यात आले याबाबत स्थिती विषद करणे आवश्यक आहे.

5) संस्था ही सेवा स्वरुपाची असल्यामुळे Central board of Excise and Customs यांचे परिपत्रकानुसार संस्था ही नोंदणी कृत संस्था असणे आवश्यक असतांना सदर संस्था ही सेवा कर नोंदणी क्रमांक असलेली संस्था नाही.

6) संस्था ही सेवा कराशी निगडीत असल्याने आयकर अधिनियम 194 जे प्रमाणे 10 टक्के टीडीएस कपात करणेबाबत तरतूद आहे. इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन शिरपुर ही संस्था मुल्यवर्धीत/ सेवा कर यापैकी कोणती कर नोंदणी संस्था नाही व संस्थेला टिडीएस कपात न करता रक्कम अदा केलेली आहे. तरी टिडीएस रु.1,73,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन यांनी दिलेले दर योग्य आहेत. याबाबत पडताळणी करण्यात आलेली नाही. शासनाने मर्यादीत केलेली रक्कम खर्च केलेली आहे.

8) व्होकेशनल ट्रेनिंगसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यात आलेले आहे. तरी ऑनलाईन फॉर्म व सर्टीफिकेटस महिला व बाल कल्याण विभागाच्या दफ्तरी ठेवण्यात आलेले नाही. तरी लाभार्थ्यांचे कोर्स पुर्ण केलेबाबत सर्टीफिकेटस उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याशिवाय योजनेची फलनिष्पती स्पष्ट दिसुन येत नाही. पूरवठा आदेशातील अटीनुसार लाभार्थ्यांना प्रशिक्षण पुर्ण करणे बंधनकारक आहे. नस्तीत जोडलेल्या अहवालानुसार बरेच विद्यार्थी हे गैरहजर अथवा नापास झालेले आहेत. प्रशासकीय अटी प्रमाणे सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. 386 लाभार्थ्यांचे लाभ दिलेबाबत प्रशिक्षण पुर्ण केले व पास झाले आहे. याबाबत प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**3.864 अंगणवाडीतील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अंगणवाडीतील मुलां मुलींसाठी गणवेश खरेदी करणे.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 861, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 11,99,975/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण समितीचे मान्येतेची यादी तपासणीत आढळून आली नाही.

2) तपासणी नस्तीसोबत रनाळा, नंदुरबार, अक्कलकुवा, नवापुर यांचे मागणी पत्र आढळून आले. उर्वरीत प्रकल्पातील मागणी पत्र लेखापरीक्षणात तपासणेवेळी उपलब्ध झाले नाही.

3) साठा नोंदवही तपासणी केली असता अक्कलकुवा प्रकल्पासाठी जिल्हा परिषद, नंदुरबार (महिला व बालकल्याण) जिल्हा परिषद/मबावि/काआ/7/2016 नंदुरबार, दिनांक 16/03/2016 नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार अक्कलकुवा प्रकल्पात 286 मुलांसाठी गणवेश व 286 मुलींसाठी गणवेश पुरवणे आवश्यक

होते. परंतु, साठा नोंदवहीची पडताळणी केली असता 55 शर्ट व 51 पँट चा कमी पुरवठा केला असल्याने जादा प्रदान रक्कम रूपये 11,225/- वसूलपात्र आहे.

**3.865 एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 24,89,050/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्रं.76/पंरा-1, दिनांक 24/1/2014 मधील परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे सदरची योजना राविबिलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

2) सदर शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सदर प्रशिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत, मुंबई (एम.के.सी.एल.) यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजीत करावे असे नमुद आहे. त्याप्रमाणे विभागाने पंचायत समिती सेस योजनेसाठी एम.के.सी.एल या संस्थेशी पत्रव्यवहार केला असता त्यांनी, त्यांचे दिनांक 01/08/2014 चे पत्रात सदर प्रशिक्षण कालावधी तीन महिन्याचा असुन प्रती विदयार्थी रूपये 3,050/- शुल्क असल्याचे कळविले आहे. त्यानुसार विभागाने सदर संस्थेस दिनांक 10/09/2014 नुसार कार्यारंभ आदेश दिलेले होते. तथापि, काही संस्थांनी तक्रारी केल्याने महिला व बालकल्याण विभाग सभा दिनांक 27/10/2014 ठराव क्र.236 अन्वये सदर कार्यारंभ आदेश रद्द करून ई-निवीदेव्दारे संस्थेची निवड करावी, असे ठरविले व त्या नुसार ई-निवीदाव्दारे सदर योजना राबविलेली आहे. ई-निवीदेत 3 निवीदा प्राप्त झाल्या असुन त्यातील तिन्ही संस्थांनी रूपये 3,350/- प्रमाणे दर नमुद केलेले आहे. त्यातील दोघांनी योजना राबविण्यास नकार दिल्यामुळे सावित्री बाई फुले बहुउद्देशिय महीला मंडळ सावदा, तालुका रावेर या तिस-या संस्थेस रूपये 3,350/- या दराने कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

3) उपरोक्त पार्श्वभुमी पाहता शासन निर्णयाप्रमाणे एम.के.सी.एल या संस्थेस कार्यारंभ आदेश देणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता केवळ तक्रारीच्या आधारे दिनांक 10/09/2014 रोजी दिलेले आदेश रद्द करून ई-निवीदा मागविल्याने रूपये 300/- जादा दराने प्रदान करावे लागले आहे.

4) एम.के.सी.एल या संस्थेकडून विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले असते, तर एकुण 1633 विदयार्थी यांना सदर योजनेचा लाभ झाला असता संस्थांनी तक्रारी केल्याने महिला व बालकल्याण विभाग सभा दिनांक 27/10/2014 ठराव क्र.236 अन्वये एम.के.सी.एल या संस्थेचा कार्यारंभ आदेश रद्द करून सावित्रीबाई फुले बहुउददेशिय महीला मंडळ सावदा, तालुका रावेर या संस्थेला कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. सदर संस्थेचे दर जादा असल्याने एकुण 1486 विदयार्थ्यांना प्रशिक्षण दिले त्यामुळे एकुण 147 प्रशिक्षण विदयार्थी योजनेपासून वंचित राहिले आहे. सदर संस्थेला कार्यारंभ आदेश दिल्यामुळे रक्कम रुपये (1486*300 = 4,45,800/-) जादा प्रदान झाले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

5) कार्यरंभ आदेश अट क्रमांक 13 नुसार पुरवठादाराने 500/- रपयांचे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना नस्तीत करारनामा आढळुन आला नाही.

6) सदर योजनेचे लाभार्थी / प्रशिक्षणार्थी यांचे प्रस्ताव विभागीय स्तरावर नाहीत. सदर प्रशिक्षणार्थीची केलेली निवड व शासन निर्णयाच्या अनुषंगाने मंजुर केलेले प्रस्ताव योग्य् असलेबाबत अनुपालन दाखवावे.

7) सदर प्रशिक्षण हा कार्यक्रम शासन निर्णयातील परिच्छेद क्रं.4 मध्ये नमुद केले प्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे. सावित्रीबाई संस्थेने तालुका स्तरावर राबविलेल्या प्रशिक्षणाचे केंद्र एम.के.सी.एल अंतर्गत असल्याचे प्रमाणीत करून अनुपालन दाखवावे.

**3.866 जिल्हा परिषदसेस मधुन मुलीना व महिलांना शिलाई मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 24,94,440/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2010/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम बँकेत भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही, तरी लाभार्थीकडून लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 2,49,444/- वसुल करुन पुर्तता करावी.

2) कामाचे नस्तीत निवीदेत भाग घेणा-यांचे अर्ज नसल्याने पुरवठादार / निवीदाधारक पात्र असलेबाबत पडताळणी करता आली.

3) पुरवठादाराने 100/- रुपयांचे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना नस्तीत करारनामा आढळुन आला नाही.

4) राज ट्रेडिंग कंपनी, जळगांव यांना जावक क्रमांक 64/16, दिनांक 12/02/2016 ने एकुण 312 नग करीता पुरवठा आदेश देण्यात आलेला असुन पुरवठादाराने ई-निवीदा फी 5,000/- तसेच बयाणा रक्कम रूपये 1,50,000/- भरणा केल्याची पावती नस्तीत आढळुन आली नाही, त्यामुळे भरणा केल्याची पडताळणी करता आली नाही.

5) ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्रक्र/597/34, दिनांक 05/10/1989 नुसार सर्व योजनातर्गत लाभ दिल्या जाणा-या लाभार्थीची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही. त्यामुळे एकाच घरातील व्यक्तींना दुबार लाभ दिला नसल्याचे प्रमाणीत करुन सदर नोंदवही अद्यावत करुन पुर्तता करावी.

**3.867 विशेष घटक योजनेअंतर्गत ग्रामिण भागातील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय महिलांना 10 टक्के हिस्सा घेऊन पिकोफॉल मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** विशेष घटक योजनेअंतर्गत सन 2014-2015 मधून सन 2015-2016 मध्ये ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मागासवर्गीय महिलांना 10 टक्के लाभार्थी हिस्सा घेऊन पिको फॉल मशिन पुरवठा केला असून सदरबाबत प्रमाणक क्रमांक 99, दिनांक 27/10/2015 अन्वये रक्कम रुपये 15,94,104/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) पंचायत समिती अंतर्गत वाटपाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विभागाकडे सादर केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक झेडपीए/2010/ अनैसक्रमांक/33/प्र.क्र.168/पंरा 1, दिनांक 22/07/2011 अन्वये 3 टक्के अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करण्यात यावा, असे निर्देश असतांना याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेबाबत अभिलेखे पडताळणीस उपपलब्ध झाले नाही.

3) जिल्हातील पंचायत समिती अंतर्गत साठा नोंदवह्या व इतर अनुषंगीक अभिलेखे लेखापरिक्षण तपासणीस उपलब्ध झाले नाही.

4) पंचायत समिती स्तरावरील अभिलेखे उपलब्ध न झालेने 10 टक्के लाभार्थी हिस्सा अचूक जमा झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामीण विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/545/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार राबविण्यात आलेल्या योजनांची फलश्रूती व मुल्यमापन करण्यात आलेले नाही.

**3.868 संगणक प्रशिक्षणाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर कामावर रक्कम रूपये 30,10,320/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेमध्ये स्थापन करण्यात आलेल्या योजना ह्या महिला बालकल्याण विभागामार्फत चालविणेबाबत (संगणक प्रशिक्षणाबाबत) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग झेडपीए/2010/ अनौसंक्र/33/प्र.क्र.168/पंरा, दिनांक 10/03/2011 नुसार इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत 13 तालुक्यांना रक्कम रुपये 30,10,320/- अनुदान वितरीत करण्यात आले आहे. याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ठ 'इ' नुसार सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी 30 जून पर्यंत घेणेची असताना दिनांक 23/07/2015 रोजी घेण्यात आली आहे. 10 नुसार विनियोग दाखले / प्रमाणपत्र 31 मार्च पर्यंत सादर करणेचे असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत तालुकानिहाय प्रमाणपत्र नस्ती सोबत प्राप्त झाली नाहीत. तरी शासनाच्या योजना राबविण्याचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही.

2) तालुकानिहाय पंचायत समिती स्तरांवरील यादी व अनुदान वितरण तपासले असता त्यात खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या.

अ) जुन्नर पंचायत समिती स्तरावरून 373 लाभार्थ्यांची प्रस्तावित यादी नस्तीसोबत दिसून आली. अनुदान वितरण 373 लाभार्थ्यांसाठी करणेचे असताना उपरोक्त आदेशांनुसार रूपये 11,55,120/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले. 373 लाभार्थ्यासाठी रूपये 11,37,650/- एवढेच अनुदान वितरीत करावयाचे असताना रक्कम रूपये 17,470/- एवढे जादा अनुदान का वितरीत करण्यात आले? याबाबत खुलासा करून जादा वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम रुपये 17,470/- वसुलात आणून (जिल्हा परिषद निधीत) भरणा करून पूर्तता दाखवावी.

ब) खेड पंचायत समिती स्तरावरून 96 लाभार्थ्यांची प्रस्तावित यादी नस्ती सोबत दिसून आली. अनुदान वितरण 96 लाभार्थ्यासाठी करणेचे असताना उपरोक्त आदेशानुसार रूपये 2,99,700/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले. 96 लाभार्थ्यासाठी रूपये 2,92,800/- एवढेच अनुदान वितरीत करावयाचे असताना रक्कम रुपये 6,900/- एवढे जादा अनुदान का वितरीत करण्यात आले? याबाबतचा खुलासा सादर करून जादा वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम रुपये 6,900/- वसुलात आणून (जिल्हा परिषद निधीत) भरणा करून पूर्तता दाखवावी.

क) मंजूर लाभार्थ्यांची यादी तपासली असता त्यात लाभार्थ्यांची नावे दुबार आहेत. तरी 2 लाभार्थ्याकडून दुबार लाभाची रक्कम रुपये 3,050 x 2 = रूपये 6,100/- वासुलात आणून जिल्हा परिषद निधीत भरणा करण्यात यावी. तालुकानिहाय लाभार्थी यादी व वितरीत करणेचे अनुदान याबाबत संबंधीतानी कोणतीही शहानिशा न करताच अनुदान वाटप केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचा निधी नाहक गुंतून पडला आहे.

**3.869 जिल्हा परिषद निधीमधून शिष्यवृत्ती प्राविण्य मिळालेल्या इयत्ता 5 वी ते 7 वी तील मुलींना सायकल वाटप करणे योजना खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,99,97,014/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट "ई" मध्ये नमूद केलेप्रमाणे शासनाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेमध्ये योजना राबविणे आवश्यक होते. परंतु, योजना राबविणेमध्ये उशीर झाला आहे. शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न केलेने नियमबाह्यता झालेली आहे. माहे मार्च अखेर लाभार्थींना योजनेचा लाभ देऊन विनियोग दाखले प्राप्त करून घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र./82/ भाग-iii/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 चे नियमपुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 3.2.1 अन्वये खुल्या स्पर्धात्मक निविदेद्वारे परिच्छेद क्रमांक 4.1 ई-निविदा पद्धतीचा वापर करून सदरची खरेदी महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार ई-निविदेचे प्रकाशन ई-निविदा पोर्टल विकसित करून ई-निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, त्याप्रमाणे ई-निविदा पोर्टल विकसीत केलेले नाही.

तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहिरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे पुढील निविदा रक्कमेची जाहिरात एका राज्यस्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केली नाही व वर्तमानपत्राचे कात्रण उपलब्ध झाले नाही.

3) सायकलची आधारभूत किंमत अथवा नमूद किंमत जी ठरविण्यात आली आहे. ती योग्य असलेबाबतचा बाजारपेठेतील सर्वेक्षण केलेचा अहवाल उपलब्ध झाला नाही. फक्त दोन कोटेशन समक्ष जाऊन आणण्यात आले. (1) सुराना शॉपी सायकल जेन्टस दर रूपये 3,700/- (2) श्री. ट्रेडर्स रूपये 3,800/- दिनांक 30/10/2015 चे नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 3.1.2.5 नुसार किंमतीचा वाजवीपणा निश्चित केलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत. किंमतीबाबत माहितीची देवाणघेवाण करून कमीत कमी किंमतीचा स्पर्धात्मक लाभ घेणेसाठी परिच्छेद क्रमांक 3.1.2.9 अन्वये तज्ञांच्या संस्थांशी संपर्क साधलेला नाही. तसेच ई-निविदा पोर्टल विकसित केलेले नाही.

4) ई-निविदेत वस्तूचे प्रत्यक्ष अचूक डिझाईन नमूद केलेले नाही

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 अन्वये परिच्छेद 4 अन्वये विवरण अ मधील नोंदवही ठेऊन लाभार्थ्यांची त्यात दरवर्षी नोंद घ्यावयाची आहे. तथापि, नोंदवही अद्यावत व सर्व रकाने पूर्ण भरलेले नसलेने दुबार लाभ दिले नसलेबाबतची पडताळणी करता आली नाही.

6) ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये 2 किमी अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थ्यांना व दारिद्र्य रेषेखालील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देऊन तद्नंतर 1 किमी अंतर व त्यानंतर 1 किमी चे आत चालत जावे लागते, अशा विध्यार्थ्यांना व दारिद्र्य रेषेखालील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकलीचा लाभ देणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे लाभार्थी निवड केलेबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2001/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 अन्वये समाजकल्याण समितीने ठरविलेल्या लाभार्थी निकषास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेचे दिसून आले नाही. त्यामुळे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशाच मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभ मिळालेची पडताळणी करता आली नाही. निवड यादी सन 2015-2016 ची म्हणजेच गतवर्षातील नसून नवीन लाभार्थ्यांची लेखापरीक्षण वर्षातील असलेबाबत पडताळणी प्राप्त प्रस्ताव दिनांकासहित आवक क्रमांकनिहाय तसेच त्यापैकी नामंजूर प्रस्ताव आदी कागदपत्रे नस्तीसोबत जोडणेत आलेली नाही व उपलब्ध ही झाली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 फलश्रुती अहवाल देणेत आला नाही.

9) उपरोक्त नियमावलीतील परिच्छेद 4.6 नुसार वॉरंटी कालावधी संपेपर्यंत अनामत परत करण्यात येऊ नये. सदरचा कालावधी 2 वर्षाचा आहे.

10) निविदा स्वीकृती प्रपत्र नियमावलीतील परिच्छेद क्रमांक 6.4 परिशिष्ठ 4 अ, तसेच बँक हमी नमुना परिच्छेद क्रमांक 6.10 परिशिष्ठ 4.6 प्रमाणे विहित नमुन्यात नाही.

**3.870 ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 29,89,000/- खर्च केला आहे. महिला व बालकल्याण समितीने ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे (आय.एस.आय.मार्क) ही योजना राबविण्याचे ठरविले त्यानुसार वरीलप्रमाणे मंजूरी व प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस महिला बालकल्याण समितीने सन 2014-2015 मध्ये प्रस्तावित केली असतांना व खर्चाच्या तरतूदीस मंजूरी दिलेली असतांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिनांक 23/10/2015 रोजी उशीराने दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्रक्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषद निधीतून राबविण्याच्या योजनांच्या वेळापत्रकानुसार कार्यवाहीबाबत परिशिष्ट “इ”

मध्ये नमूद केलेप्रमाणे 30 सप्टेंबर अखेर पुरवठा आदेश देणे अनिवार्य असता त्यानुसार त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) लाभार्थी निवड करणेपूर्वी त्यांना दुबार लाभ दिला नसलेबाबत गावनिहाय लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवली असलेबाबत प्रत्येक पंचायत समितीनिहाय खात्री करुन लाभार्थी प्रस्ताव सादर केलेबाबत गटविकास अधिकारी यांची प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत.

3) पंचायत समिती कराड कडील लाभार्थ्यांची मागणी संख्या 34 असून मंजुर 22 लाभार्थ्यांना पुरवठा केला आहे. त्यामुळे 12 पात्र लाभार्थ्यांना वंचित राहावे लागले आहे. याबाबत कारणासह तपशिल उपलब्ध करणे आवश्यक आहे.

4) पंचायत समिती फलटण कडील डिलेव्हरी चलनावर पंचायत समितीकडील माल प्राप्त पोहोच दिनांक नमूद नसल्यामुळे साहित्य वेळेवर प्राप्त झाल्याचे आढळत नाही. प्रत्यक्ष माल पोहोच झाल्याच्या दिनांकाबाबत माहिती घेऊन पुरवठा आदेशामधील अट क्रमांक 1 नुसार 6 आठवडे किंवा दिनांक 31/03/2016 नंतर पोहोच केलेल्या मालाबाबत पुरवठा आदेश दिनांक 12/02/2016 मधील अट क्रमांक 6 नुसार दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या सर्व साहित्य प्राप्त झाले असून त्यानुसार प्राप्त वाटप व शिल्लक साहित्य पंचायत समितीनिहाय अहवाल घेतलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/578, दिनांक 19/01/1995 नुसार 10 टक्के लाभार्थीस लाभ देण्यापूर्वी वसूल करणे आवश्यक होते. सदर योजना 90 टक्के अनुदानावर असल्याने लाभार्थी हिस्सा वसूल करुन त्यानंतर खरेदी आदेश देणे आवश्यक असतांना लाभार्थी हिस्सा वसूल करण्यात आला नाही. या बाबीमुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे एकूण प्रदानापैकी 10 टक्के लाभार्थी हिश्यापैकी रक्कम रक्कम रुपये 2,93,020/- वसुल केली आहे. रक्कम रुपये 5,880/- वसुल होणे आवश्यक आहे.

6) पुरवठा आदेशातील अटीप्रमाणे वॉरंटी कालावधीमध्ये पिठाची गिरणी चालू आहेत किंवा कसे? चालू नसल्यास पुरवठादाराकडून दुरुस्ती / बदली केले किंवा कसे? याबाबत पाठपुरावा केलेचे आढळले नाही. तसेच वाटप गिरणी चालू असून महिला लाभार्थ्यांना आर्थिक उत्पन्न मिळत आहे किंवा कसे? याबाबत चालू लेखापरीक्षण कालावधी अखेर विनियोग दाखले तसेच कार्यव्ययी दाखले प्राप्त केलेले नाहीत.

### 3.871 इयत्ता 4 थी ते इयत्ता 10 वी पर्यंतच्या मुली व महाविद्यालयीन मुलींना ज्युडोकराटे प्रशिक्षण देणेबाबत.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 483, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,45,403/- खर्च केला आहे.

सदर योजना राबविणेचे महिला बालकल्याण समितीने प्रशासकीय मंजुरीने वरीलप्रमाणे कार्यवाही केली आहे. तथापि, सदर योजना फक्त निवड केलेल्या शालेय प्रशिक्षणार्थीनींकरीताच राबविली असून सदर योजना ही इयत्ता 4 थी ते 10 वी व महाविद्यालयीन विद्यार्थीनींकरीता राबविण्याचे असताना फक्त इयत्ता 4 थी ते 10 वी या विद्यार्थीकरिता राबविलेचे दिसून येते. उपरोक्त खर्चाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 12, दिनांक 05/11/2016 अन्वये खुलासा मागविला होता. तथापि, त्याबाबत खुलासा न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 अन्वये खाते प्रमुखांना प्रदान केलेले आहेत. त्या अधिकारान्वये सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिली असून सदर मंजुरी आदेशावर कार्यालयीन जावक क्रमांक नोंदलेले नाहीत.

2) अंदाजपत्रकीय तरतूदीस दिनांक 03/09/2015 मान्यता असतांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी उशीरा म्हणजेच दिनांक 02/11/2015 रोजी दिल्याने ई-निविदा प्रक्रियेस विलंब झाला आहे. त्यामुळे सदर योजना राबविण्यास विलंब झाला आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील परिच्छेद क्रमांक 2 अन्वये प्रशिक्षणार्थिंना किमान 6 महिन्यांचे प्रशिक्षण देण्याचे आहे. तथापि, सदर योजना राबिवताना प्रशिक्षणार्थींना दिनांक 08/02/2016 ते दिनांक 30/03/2016 म्हणजेच 52 दिवसांचे प्रशिक्षण दिल्याचे नस्तीवरून दिसून येते.

4) सदर नस्तीची पडताळणी करताना सातारा जिल्हा कराटे डू असोसिएशन, नागठाणे यांनी बयाना रक्कम रूपये 25,000/- दिनांक 22/02/2016 रोजी चलनाने भरणा केला असून सदर दिवशीचा रूपये 100/- च्या मुद्रांकवर कोणताही करारनामा केल्याचे आढळून आलेले नाही. मात्र मुख्याध्यापकांच्या अहवालानुसार दिनांक 08/02/2016 पासून प्रशिक्षणार्थिंना प्रशिक्षण दिल्याचे दिसून येते. उपरोक्त प्रमाणे विसंगती दिसून येते.

5) सदर प्रशिक्षण संस्थेला रक्कम अदा करताना देयकातून आयकर 2 टक्के रक्कम रूपये 18,908/- कपात करून अदा करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.872 ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** महिला बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा सन 2015-2016 मध्ये ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिन पुरविणेसाठी प्रमाणक क्रमांक 424, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,02,978/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 अन्वये खाते प्रमुखांना प्रदान केलेले आहेत. त्या अधिकारान्वये सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिली असून सदर मंजुरी आदेशावर कार्यालयीन जावक क्रमांक नोंदलेले नाहीत.

2) अंदाजपत्रकीय तरतूदीस दिनांक 15/09/2015 ला मान्यता असतांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी उशीरा म्हणजेच दिनांक 23/10/2015 रोजी दिल्याने ई-निविदा प्रक्रियेस विलंब झाला आहे. त्यामुळे सदर योजना राबविण्यास विलंब झाला आहे.

3) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती मधील मुद्दा क्रमांक 3 नुसार शिलाई मशीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे पोहोच केलेनंतर त्यांचेकडून पोहोच घेऊन त्या पोहोच पावतीवर पंचायत समितीकडील साठा रजिस्टर पान नंबर व साहित्य प्राप्त तारीख नमूद करून घेण्यात यावी. असे असताना पंचायत समिती माण-दहिवडी व पाटण यांनी त्याप्रमाणे पोहोच दिलेल्या नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1080/सीआर/1074/57, दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त झालेले नाहीत.

5) लाभार्थी हिश्यापोटी लाभार्थ्यांच्याकडून 10 टक्के वसूल केलेल्या चलनांची पडताळणी केली असता एकूण 10 टक्के लाभार्थींचा हिस्सा रूपये 80,230/- इतकी रक्कम वसूल होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात दिनांक 31/03/2016 ते दिनांक 31/08/2016 अखेर रक्कम रूपये 69520/- जमा करणेत आली आहे. अजूनही रक्कम रूपये 10,710/- वसूल करून जमा करणे बाकी आहे.

6) प्रत्यक्ष मंजुर लाभार्थी यादी 226 असताना 196 लाभार्थ्यांचा 10 टक्के हिस्सा जमा करण्यात आलेला आहे. उर्वरित 30 लाभार्थ्यांचा 10 टक्के हिस्सा अद्यापही जमा करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील परिच्छेद क्रमांक 16 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांच्या 10 टक्के जमा हिस्सासहित साहित्य खरेदी करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 अन्वये विहित केलेल्या नमुना प्रपत्र

"अ" मध्ये गावनिहाय, योजनानिहाय लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवण्यात येऊन प्रत्येक वर्षी लाभार्थींना दिलेल्या लाभाची नोंद, सदर नोंदवहीत वर्षनिहाय ठेवण्यात आली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ दिला गेला किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही.

**3.873 सायकल खरेदी खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 147, दिनांक 29/12/2015 अन्वये रक्कम रुपये 6,98,950/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी पोच व शासनास पाठविलेले उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

2) शासन दर व निविदा दर यामधील तफावतीबाबत संबधीत पुरवठादारास विचारणा करणे आवश्यक होते, तसेच पुरवठाधारकाने तशी कारणे नमूद करणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही.

3) लखोटा क्रमांक 1 व 2 उघडलेवर त्यावर वित्त विभागाचे अभिप्राय घेतलेले नाहीत.

4) पात्र निविदाधारकापैकी परीक्षित अग्रो टेक व पार्श्व यांची नावे अनुक्रमे अश्विनी बाबुराव हेरले व हेरले असून त्यांनी भरलेल्या निविदा एकाच ip address - 2015-sangli-69520-1 वरून भरल्याचे दिसून येते. आर्णव यांनी कोणत्या ip address वरून online निविदा भरली याबाबत नोंद नाही. यावरुन भरणा केलेल्या निविदामध्ये स्पर्धा झाल्याबाबत साशंकता निर्माण होत असून त्यामुळे योग्य दर प्राप्त झाल्याबाबत खात्री करता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 6 व परिशिष्ट 4 नुसार सायकल खरेदी ही मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून करणे आवश्यक होते. तथापि, त्याबाबत केलेला पत्रव्यवहार नस्तीसोबत नाही.

6) नस्तीची पडताळणी केली असता त्यामध्ये शासन दर हा रूपये 3,096/- आहे. म्हणजे अक्सेसरीज धरून तो रूपये 3,461/- अधिकतम किंमतीपेक्षा कमी आहे. त्यामुळे त्यानुसार खरेदी केली असती तर रक्कम रूपये 3,990-3, 461 = रूपये 529/- प्रती नग प्रमाणे रक्कम रूपये 92,575/- ची बचत झाली असती. सदर रक्कम रूपये 92,575/- वसुली करून पूर्तता दाखवावी.

**3.874 इलेक्ट्रॉनिक वजनकाटे खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सांगली चे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात इलेक्ट्रिक वजनकाटे खरेदीबाबत प्रमाणक क्रमांक 682, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 12,46,050/- खर्च करण्यात आला आहे.

1) अंगणवाडीतील बालकांच्या विकासासाठी साहित्याची खरेदी करणे आवश्यक होते. यासाठी 15 ते 20 किलो पर्यंत चे वजन काटे घेणे संयुक्तिक ठरले असते. तथापि, 100 किलो चे वजन काटे घेण्याचे प्रयोजन समजून येत नाही. तरी सदर 100 किलो वजन काटे कशाच्या आधारे निश्चित केले? याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

2) महिला बालकल्याण समिती बैठक मधील ठराव क्रमांक 48, दिनांक 11/09/2015 नुसार झोळीचा वजन काटा खरेदी करणेस मान्यता मिळाली होती. परंतु, दिनांक 06/11/2015 च्या समितीच्या बैठकीत ठराव क्रमांक 63 नुसार इलेक्ट्रिक वजन काटे खरेदी करणेसाठी मान्यता देण्यात आली आहे. प्रत्यक्ष पुरवठा आदेश देताना संदर्भांमध्ये दिनांक 11/09/2015 चा झोळीचा वजन काटा खरेदीबाबत ठराव नमूद केला आहे व पुरवठा आदेशामध्ये इलेक्ट्रिक वजन काटे पुरवणेचा आदेश दिला आहे. ही बाब विसंगत आहे.

3) रिलायंस प्रीन्सिंग सिस्टिम, मुंबई यांचेकडून वेळेत खरेदी करणेचे ठरले असता खरेदी प्रक्रिया विलंब झाला असून खालीलप्रमाणे एका नगास रुपये 6,390 - 6,356 = रूपये 34/- प्रमाणे रुपये 6,630/- जादा रक्कमेचे प्रदान झाले असून एक अंगणवाडी लाभापासून वंचित राहूनही रक्कम रूपये 274/- जादा अदा करणेत आली आहे.

4) सदर वजनकाटे चे warantty card नस्तीसोबत नाहीत. तसेच विक्री पश्चात सेवा घेणे देणेबाबत कोणताही तपशील नोंद नस्तीसोबत नाही.

5) पुरवठा आदेश दिनांक 11/12/2015 चा असून करारनामा दिनांक 15/02/2016 चा आहे.

6) अगणवाडींची निवड केलेबाबतचा ठराव नस्तीसोबत नाही.

7) साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

**3.875 ग्रामीण भागातील महिलांसाठी समुपदेशन केंद्रास अनुदान वाटप खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 74,675/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/ पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील मार्गदर्शक सुचनानुसार पोर्ले तर्फ बोरगांव जिल्हास्तरसाठी समुपदेशन कार्य केलेल्या संस्थेकडे टिपणी पान नंबर-N3 मध्ये महिला आयोगाची मान्यता आहे असे नमुद आहे. तथापि, याप्रमाणे पुराव्यादाखल कोणतेच अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयामध्ये निवड करण्यांत आलेल्या स्वयंसेवी संस्थेकडे समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ आर्थिक क्षमता, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असाव्यात असे नमुद असतांना याबाबत पडताळणी किंवा खात्री केलेबाबत अभिलेखे उपलब्ध नाहीत.

3) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयामध्ये समुपदेशाकरीता एक समुपदेशक, एक विधी सल्लागार व प्रशासनीक खर्च याप्रमाणे होणाऱ्या खर्चाची रक्कम धनादेशाव्दारे संबंधीत समुपदेशन स्वयंसेवी संस्थेच्या नांवे धनादेशाव्दारे प्रदान करण्यात यावी असे सुचित केलेले असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

4) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयामध्ये समुपदेशन केंद्राकडून मासिक प्रगती अहवाल दरमहा घेण्यांत यावेत अन्यथा रक्कमेचे प्रदान करणेत येऊ नये असे सुचित असतांना माहे जानेवारी 2016 ते मार्च 2016 या तिन्ही महिन्याचा त्रैमासिक अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध नाही. तथापि या कालावधीच्या रक्कम रूपये 74,675/- प्रदान करणेत आलेले आहे.

5) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयामध्ये योजना जिल्हास्तर व ग्रामीणस्तर अशी राबवावी असे सुचित असतांना सन 2015-16 करीता जिल्हा परीषद स्वनिधीमधुन रक्कम रुपये 12,00,000/- मंजूर असूनही ही योजना फक्त जिल्हा स्तरावर राबविण्यांत आली. ग्रामीण स्तरावर सदरील योजना राबविण्यांत आली नाही. त्यासाठी मंजूर असणांरा निधी माहे मार्च 2016 अखेर अखर्चित राहील्याने योजनेचा लाभ ग्रामीण स्तरापर्यंत पोहोचविण्याची विभागाने कार्यवाही केलेली नाही.

6) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयामध्ये जिल्हा कक्षाकडे निधी उर्वरित राहिल्यास त्याचे पुर्नर्वियोजन करण्यांत यावे असे सुचित करण्यांत आलेले असतांना याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेची दिसुन येत नाही. उर्वरित रक्कम रुपये 12,00,893/- माहे मार्च 2016 अखेर अखर्चित राहिल्याचे दिसून येत आहे.

7) दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयानुसार स्वयंसेवी संस्थेने समुपदेशन व विधी सल्लागाराचे नियुक्तीबाबत अभिलेखे विभागाकडे देणे आवश्यक असतांना असे कोणतेच पुरावे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाहीत. त्यामुळे संस्थेने संबंधीतांना प्रदान केलेल्या मानधनाच्या रक्कमेच्या योग्यतेबाबतची पडताळणी करता आली नाही.

**3.876 महिलांना व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे अंतर्गत ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 19,27,352/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खर्चाबाबतच्या संचिकेतील दिनांक 05/10/2015 ची सामान्य प्रशासन विभागाची टिपणी व त्यानुसार सदर योजना प्रभावीपणे अंमलबजावणीकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेकरीता जाहिरात देणेबाबतच्या स्पष्ट सुचना देणेत आलेल्या आहेत. तथापि त्याप्रमाणे विभागामार्फत कार्यवाही करणेत आलेली नाही. फक्त दैनिक

तरुण भारत मध्येच जाहिरात दिलेली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त स्पर्धात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे ई-निविदा बाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन झाले आहे असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे.

2) आजरा, शिरोळ व गडहिंग्लज वगळता कोणत्याच विभागाकडून फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेण्यात आलेला नाही. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश साध्य झाला याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) ई-निविदेतील अटी व शर्ती - अट क्रमांक 11 व 12 नुसार प्रशिक्षणे सुरु झाल्यानंतर सात दिवसाच्या आंत प्रशिक्षण स्थळ, नेमलेले प्रशिक्षक व त्यांची यादी, प्रशिक्षणार्थींची संख्या, प्रशिक्षण देण्याचे गांव, लाभार्थी निवड प्रक्रीया व त्याबाबतची कार्यवाही इत्यादी माहिती सविस्तर द्यावी असे नमुद असतांना याप्रमाणे विभागाकडुन कार्यवाही करणेत आलेली नाही.

4) विभागाकडुन किंवा जिल्हा परिषदेच्या अन्य सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशिक्षण स्थळी आकस्मिक भेट दिल्याचे किंवा याप्रमाणे पर्यवेक्षकीय कार्यवाही केल्याची अभिलेख्याव्दारे स्पष्ट होत नाही. त्यासंदर्भांत खात्री किंवा पडताळणी करता आली नाही.

5) ई-निविदेतील अटी व शर्ती - अट क्रमांक 19 नुसार प्रशिक्षण संथेने सादर केलेल्या प्रशिक्षकांच्या यादीतील प्रशिक्षकांनीच प्रशिक्षण देणे अनिवार्य असेल यादीबाहेरील प्रशिक्षक नेमले असलेस प्रदान केले जाणार नाही. तथापि प्रशिक्षकांची यादी संस्था दप्तरी नसलेमुळे याबाबत योग्य ती कार्यवाही केलेची खात्री किंवा पडताळणी करता आली नाही.

6) ई-निविदेतील अटी व शर्ती - अट क्रमांक 21.4.17 नुसार लाभार्थी हिस्सा रक्कम प्रशिक्षणापूर्वी जमा होणे आवश्यक होते. तथापि प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर लोकहिस्सा रक्कमेचा भरणा प्रशिक्षणादरम्यान जिल्हा परिषद निधीत जमा केलेले आहे. त्याचप्रमाणे पन्हाळा तालुका लोकवर्गणीचा हिस्सा रक्कम रुपये 16,109/- चलनाव्दारे जमा केलेले दिसुन येत नाही. पडताळणी करीता चलन उपलब्ध नाही. त्यामुळे सदरील लोकहिस्सा रक्कम वसुली करुन त्वरीत जिल्हा निधीमध्ये भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**3.877 ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरण पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 61,53,576/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठराव क्रमांक 986, दिनांक 19/01/2016 अन्वये प्राप्त दर बाजारभावापेक्षा जादा असलेने फेर-निविदा काढण्याचे निश्चित करण्यात आले आहे. प्रथम ई-निविदेतील 4 निविदा पात्र ठरल्यानंतरदेखील सदर निविदा रद्द करून फेर-निविदा घेण्यात आली आहे.

2) परंतु प्रथम निविदेतील लोकमंगल प्रिंट एन पॅक लि.सोलापूर यांची रूपये 16,200/- या सर्वात कमी दराची निविदा होती. तसेच फेर-निविदेतील मिल्सन सेल्स कार्पोरेशन, पुणे यांची रूपये 16,350/- ची सर्वात कमी दराची निविदा वाटाघाटीअंती रूपये 16,300/- निश्चित करण्यात आली आहे. यावरून प्रथम निविदेपेक्षा फेर-निविदेतील दर रूपये 100/- ने अधिक असल्याचे दिसते. त्यामुळे एकूण 429 नग खरेदीसाठी प्रथम निविदेपेक्षा फेर-निविदा रक्कम रूपये100*429 = रुपये 42,900/- इतक्या दराने महाग पडल्याचे दिसून येते. याचा अर्थ 2 निविदा घेऊनही कमी दराचा लाभ न घेता खरेदी करण्यात आली आहे. तथापि, बाजारभावापेक्षा जादा दर असलेने फेर-निविदा काढली हे कारण प्रत्यक्ष परिस्थितीशी विसंगत वाटते. तरी रक्कम रूपये 42,900/- वसूलपात्र ठरविणेत येत आहे.

3) फेर-निविदा घेतल्याने प्रथम निविदा प्रसिद्धीचा खर्च रूपये 4,480/- तसेच प्रथम निविदेतील 4 निविदाधारकांचे साहित्य जिल्हा परिषदेमार्फत तपासणी करण्याचा खर्च रूपये 8,015/- वाया गेल्याचे दिसते. शिवाय स्पेसिफिकेशनबाबत सर्व निविदाधारकांनी तपासणी अहवाल सादर केला असताना जिल्हा परिषदेने स्व-खर्चाने तपासणी करून घेण्याबाबत आवश्यकता स्पष्ट होत नाही. तरी निविदा प्रसिद्धी व साहित्य तपासणीचा नाहक खर्च एकूण रक्कम रूपये 12,495/- वसूलपात्र ठरविणेत येत आहे.

4) निविदेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक24 (10) नुसार तांत्रिक लखोटा क्रमांक 1 मध्ये नमुना साहित्य हे दिलेल्या तपशिलाप्रमाणे असलेबाबत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा तत्सम शासकीय

संस्थेचा दाखला सादर करणेचा आहे, सदर कागदपत्रांचा तांत्रिक लखोट्यामध्ये समावेश असलाच पाहिजे असे विशेष नमूद आहे, असे असताना मंजूर निविदाधारक मे.मिल्सन कार्पोरेशन, पुणे यांचे निविदेतील तांत्रिक लखोटा क्रमांक 1 मध्ये सोनाई प्रायव्हेट इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टिटुट, गोखळी, तालुका इंदापूर, जिल्हा पुणे या खाजगी संस्थेचा दाखला देण्यात आला आहे. तथापि, शासकीय संस्थेचा दाखला नसलेने अत्यावश्यक अशा तांत्रिक बाबीची पूर्तता निविदाधारकाने केलेली नाही. तरीही सदर निविदा मंजूर करण्यात आली आहे. ही बाब नियमबाह्य आहे.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार पुरवठा करणेपुर्वी ई-निविदेतील नमूद केलेप्रमाणे साहित्य नमुन्यात असलेबाबत शासकीय तंत्रनिकेतन अगर तत्सम शासकीय प्राधिकरणाकडून दाखला घेऊन कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. परंतु निविदाधारकाने पुरवठा करणेपुर्वी असा दाखला दिल्याचे नस्ती किंवा देयकास दिसून आले नाही.

6) पुरवठाच वर्षाखेरीस झालेने सर्व साहित्य पंचायत समिती स्तरावर सन 2015-16 ला शिल्लक आहे. त्यामुळे शासनाचे परिपत्रकानुसार योजनेचा उद्देश सफल होत नाही.

**3.878 शिल्लक साहित्याबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2015-2016 मधील महिला व बालविकास समिती सभा कार्यवृत्तांत नोंदवहीचे अवलोकन केले असता, सन 2014-2015 व त्यापूर्वी खरेदी केलेले साहित्य शिल्लक असल्याने ते समितीची मंजूरी घेवून वाटप केले आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 13, दिनांक 09/05/2017 अन्वये पंचायत समिती स्तरावरील शिल्लक साहित्याची मागणी करुनही शिल्लक साहित्याबाबत अभिलेखे सादर केले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1096/प्र.क्र.178/85, दिनांक 09/01/1997 नुसार एखाद्या कल्याणकारी योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचे वाटप त्याच आर्थिक वर्षात होणे आवश्यक आहे. तथापि, मुळ आक्षेपात नमूद साहित्य पंचायत समितीस्तरावर विना वाटप राहिल्याने योजनेचा हेतू सफल झालेला नसून साहित्य खराब व नादूरूस्त होऊन निरुपयोगी होण्याची शक्यता आहे. विभागाने सन 2015-2016 या कालावधीत गट ब वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना शिल्लक साहित्याचा तपशील घेवूनच योजना राबविणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सन 2011-2012 पासून वैयक्तिक लाभाच्या योजनामधील साहित्य शिल्लक असताना सन 2015-2016 मध्ये त्याच योजना राबविल्या आहेत.

**3.879 महिला बालकल्याण विभागातील लाभार्थ्यांचे मंजूर यादीमध्ये नावे नसताना साहित्य वाटत केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 12 लाभार्थ्यांचे जिल्हा परिषद, महिला बालकल्याण समिती यांच्या मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या यादीमध्ये लाभार्थ्यांचे नावे नसताना शिलाई मशिनचा लाभ देण्यात आलेले आहेत. लाभार्थ्यांकडून प्रती लाभार्थी रूपये 3,750 X 12 = रूपये 45,000/- संबंधीताकडून वसूल करण्यात यावे.

2) लाभार्थ्यांच्या यादीमध्ये वरील लाभार्थ्यांचे नावे नसताना 6 पिको फॉल मशीन लाभ देण्यात आलेले आहे. लाभार्थ्यांकडून प्रती लाभार्थी रूपये 5,497 X 6 = रूपये 32,982/- संबंधीताकडून वसूल करण्यात यावे.

3) लाभार्थ्यांच्या यादीमध्ये 3 लाभार्थ्यांचे नावे नसताना पिठाची गिरणीचा लाभ देण्यात आलेला आहे. लाभार्थ्यांकडून प्रती लाभार्थी रूपये 10,990 X 3 = रूपये 32,970/- संबंधीताकडून वसूल करण्यात यावे.

4) लाभार्थ्यांच्या यादीमध्ये 2 लाभार्थ्यांचे नाव नसताना सौर कंदीलचा लाभ देण्यात आलेला आहे. लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल करण्यात यावे.

**3.880 90 टक्के अनुदानावर महिलांना साधी शिलाई मशिन पुरविण्याबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 19,92,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदेतील अट क्रमांक 10 प्रमाणे निविदा धारकाने 30 टक्के इतक्या रक्कमेचे म्हणजे मागील 3 वर्षी 30 टक्के पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु दोन निविदाधारक (1) योगी मार्केटिंग गौरक्षण मॉकेट व शाम एजन्सी अमरावती हे अट पुर्ण करिता नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे फेरनिविदा बोलविण्यात आलेल्या आहेत. फेरनिविदा मध्ये सुध्दा 4 निविदा प्राप्त झाल्या त्यामध्ये सुध्दा वरिल निविदाधारकांनी निविदा सादर केलेल्या आहे. प्रथम निविदे प्रक्रियामध्ये जे निविदा धारक पात्र नसतांना दुबार राबविण्यांत आलेल्या प्रक्रियामध्ये त्यांना कसे पात्र ठरविण्यात आले. याबाबत खुलासा करावा. त्यामुळे दुबार ई निविदेवर विनाकारण खर्च केल्याचे दिसुन येते.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं/2014/प्र.क्र.82/ भाग iii/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती मधिल अ.क्र.11 नुसार खरेदीविभागाने आवश्यक त्या वस्तूंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पूर्वीच होईल. अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवावयाची आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

3) श्रीनाथ जनरल स्टोअर्स अहमदनगर यांनी दिनांक 15/03/2016 पर्यंत 3 टक्के सुरक्षा ठेव जमा केली नसतांना व करारनामा केला नसतांना पूरवठा आदेश दिनांक 01/03/2016 ला कसा देण्यात आला.

4) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) अमरावती यांचे पत्र क्र.418, दिनांक 10/03/2016 व 450 दिनांक 15/03/2016,509 दिनांक 19/03/2016 नुसार पुरवठा 3 दिवसाचे आत करणे बाबत कळविले आहे. अन्यथा काळया यादित टाकण्याची कार्यवाही करण्यांत येईल असे ठरविले आहे. परंतु पुरवठा प्रकल्प स्तरावर 3 दिवसाच्या आत प्राप्त झाला नसुन वर ठरविलेल्या पत्रा नुसार सबंधितावर कार्यवाही करण्यांत आली नाही.

5) योजना राबविण्यापूर्वी तथा पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थीची निवड करुन सर्व साधारण सभेमध्ये यादी मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. परंतु या योजनेमध्ये साहित्य प्रकल्प स्तरावर पाठविल्यानंतर साहित्य जसे-जसे वाटप करत आहे, तस-तसे त्या लाभार्थीचे नाव टाकून प्रकल्प स्तरावर यादी पाठविण्यात येत आहे. यावरुन लाभार्थी निवड करण्यात आलेली नाही.

6) 10 टक्के प्रती लाभार्थी रुपये 358/- प्रमाणे किती लाभार्थीनी लाभार्थी हिस्सा भरणा केला या बाबतचे अभिलेखे प्राप्त झालेले नाही.

7) सर्व प्रकल्प स्तरावर प्राप्त केलेल्या डिलीव्हरी चलान वर प्रमाणपत्रामध्ये साठा पुस्तक पान क्रमांक ची नोंद घेतल्याचे नमुद नाही.

8) लाभार्थी निवड न केल्यामुळे प्रकल्प स्तरावर 107 नग लेखापरिक्षणाच्या दिनांका पर्यंत पडुन असल्याचे दिसुन येते.

9) शिलाई मशिन प्राप्त झाल्या बाबत स्टॉकबुकवर 10 लाभार्थीची स्वाक्षरी नाही.

10) उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही.

**3.881 पाचवी ते बारावी पर्यंत शिकणाऱ्या ग्रामीण शाळकरी मुलींना मोफत लेडीज सायकल पुरविणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वि.घ.यो.लेखाशिर्ष 3266 सन 2014/2015 मधील अखर्चीत निधी रुपये 3,345/- व आदिवासी उपयोजना लेखाशिर्ष 2297 सन 2014-2015 मधील अखर्चीत निधी रुपये 2,300/- एकूण निधी रुपये 5,645/- सदरहू निधी योजनेचा असल्यामुळे सन 2015-16 मध्ये वापरणे आवश्यक होता. परंतु सन 2015-16 मध्ये खर्च न केल्याने शासनखाती परत करणे आवश्यक आहे. तरी वरील शिल्लक निधी शासन खाती परत करुन अनुपालन दर्शवावे.

2) जाहीर ई-निविदा सुचना मधील दिलेल्या अटी मध्ये कोणत्या दिनांकापासुन कोणत्या दिनांकापर्यंत निविदा भरता करता येईल याचा उल्लेख केलेला नाही. तसेच तांत्रिक लिपाफा क्र.1 ऑन लाईन पध्दतीने कोणत्या

दिनांकास उघडल्या जाईल याचा उल्लेख नाही. म्हणजेच मोघम स्वरुपात केवळ देखावा करण्याचे दृष्टिने ई-निविदा काढल्या असल्याचे दिसून येते. ई-निविदा सुचनामध्ये दिनांक नमुद न करण्यांचे कारण स्पष्ट करावे.

3) परफेक्ट ट्रेडर्स कोल्हापूर यांच्या निविदेमध्ये 20 इंच सायकल बाबत उल्लेख आढळून आला नाही. तसेच तयार करण्यांत आलेल्या तुलनात्मक तक्तामध्ये तिनही पूरवठादाराचे दर नमुद करण्यांत आलेले नाही.

4) मे.साद एन्टरप्रायजेस देवरुख, तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी यांच्या करारनाम्यावर कोणत्या दिवशी करारनामा करुन दिला याबाबत दिनांक नमुद नाही. तसेच लिहुन देणार व घेणार तसेच साक्षीदाराच्या स्वाक्ष-या नाही. म्हणजेच केवळ करारनामा केल्याचा आभास निर्माण केलेला आहे. करारनामा केला नसल्याचे लेखापरिक्षणास दिसुन येते.

5) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्रमांक 288, दिनांक 15/02/2016 नुसार ई-निविदे मध्ये ज्या लेडीज सायकलचे दर मागविण्यांत आले होते. त्या सायकलचे शासनदर करारातील प्रती नगाची किंमत रुपये 3,555/- दर्शविण्यांत आली असल्याचे नमुद आहे. व ई-निविदेमध्ये मे.साद एंन्टरप्रायजेस देवरुख यांनी लेडिजसायकलचे प्रति नग रुपये 4,000/- दर्शविल्यामुळे त्यांना दिनांक 15/02/2016 रोजी दर कराराबाबत वाटाघाटी करण्याकरिता उपस्थित राहण्याबाबत कळविले आहे. परंतु पत्र दिनांक 15/02/2016 ला दिले असतांना वाटाघाटी करीता दिनांक 15/02/2016 लाच उपस्थित राहणेबाबत कळविणे हे संयुक्तीक वाटत नाही. तसेच वाटाघाटी नंतर काय झाले त्या बाबतचे अभिलेखे दप्तरी आढळून आले नाही. केवळ वाटाघाटी केल्याचा आभास निर्माण केलेला आहे.

6) ई-निविदे मध्ये ज्या लेडीज सायकलचे दर मागविण्यांत आले होते. त्या सायकलचे शासनदर करारातील प्रती नगाची किंमत रुपये 3,555/- व दरकराराची मुदत दिनांक 30/06/2015 असतांना, तसेच योजनेचे लाभार्थी निवड न करता साहित्य बोलाविले असतांना, वाटाघाटी करुन जर शासन दर करारामध्ये नमुद असलेल्या कंम्पनीकडुन किंवा त्या दराप्रमाणे वाटाघाटी करुन साहित्य खरेदी केले असते तर रुपये 1,22,375/- शासनाचे नुकसान झाले नसते. हयाबाबत सबंधीतावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

7) प्राप्त झालेल्या साहित्याच्या डिलीव्हरी चलानवर मागील बाजूस दिलेल्या प्रमाणपत्रावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, अमरावती यांची स्वाक्षरी नाही. तसेच प्रकल्पस्तरावर साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते, परंतु ते घेण्यांत आलेले नाही.

8) योजना राबविण्यापूर्वी सर्व आराखडा तयार करुन लाभार्थींची यादी मंजूर करुन घेतल्यानंतर साहित्य बोलाविणे तथा योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु लाभार्थी निवड न करता केवळ निधी परत जावू नये, म्हणून साहित्य खरेदी केल्यानंतर सोईनुसार वाटप करण्यांत येत असल्याचे, तसेच साहित्य खरेदी केल्यानंतर जूलै 2016 पावेतो साहित्य वाटप झाले नसल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) अमरावती यांचे पत्र क्रमांक 187, दिनांक 22/07/2016 च्या पत्रावरुन दिसुन येते. तसेच साहित्य वाटप झाल्यानतर यादी मंजूर करण्यांत येईल असे सुध्दा सदर पत्रामध्ये स्पष्ट केलेले आहे. म्हणजेच यादीस मंजूरीप्राप्त न होताच साहित्य वाटप केल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरुन दिसुन येते.

9) पंचायत समिती वरुड यांना पुरवठा आदेश क्रमांक 308, दिनांक 24/02/2016 नुसार सायकली पुरविण्यांत आलेल्या आहे. परंतु वरुड प्रकल्पस्तरावरील स्टॉक बुक व लाभार्थीचे अर्ज लेखापरिक्षणास सादर करण्यांत आलेले नाही. त्यामुळे लाभार्थीस वाटप झाले किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. व शिल्लक असलेल्या साठ्याबाबत ताळमेळ घेता आला नाही.

10) पंचायत समिती भातकुली येथील स्टॉकबुकची तथा लाभार्थी अर्जाची पडताळणी केली असता स्टॉकबुक प्रामाणित केलेले नाही, सर्वसाधारण प्रवर्गातील 24 व अ.जा प्रवर्गाकरिता 19 सायकली प्राप्त झाल्या परंतु स्टॉकबुकला पुरवठा आदेशानुसार नोंद केली नसुन एकत्रित नोंदीघेण्यांत आलेल्या आहे. यादी नुसार वाटप केल्याची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे यादी नुसार वाटप झाल्याची खात्री होत नाही. एकूण 43 अर्ज असणे आवश्यक आहे. परंतु 31 अर्ज असुन 12 अर्ज दप्तरी उपलब्ध नाही. कु.आम्रपाली राजू मकेश्वर वर्ग 12 वा व प्रतिक्षा राजू मकेश्वर वर्ग 9 वा रा. जवळा हिरापूर एकाच कुटूंबातील दोघींना लाभ दिलेला आहे.

11) पंचायत समिती मोर्शी यांच्या अनुसुचित जातीच्या सर्व अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही.

12) कु.प्रणाली संदिप डाहाके पंचायत समिती दर्यापूर हिची साहित्य प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी घेण्यातली नाही.

**3.882 इयत्ता 10 वी व 12 वी पास मुलींकरीता MS-CIT संगणक प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,90,050/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीऐ2013/प्रक्रं76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील परीच्छेद 04 अन्वये या योजनेचा लाभ दारीद्रय रेषेखालील कुटूंब तसेच ज्या कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न रुपये 50,000/- पर्यंत आहे, अशा कुटूंबातील मुलींना प्राधान्याने देण्यात यावा असे नमुद आहे. एम एस सी आय टी प्रशिक्षण हा कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई (एम.के.सी.एल.) यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजीत केलेले असावे. सदर प्रशिक्षणाचा आदेश सनी इन्फोटेक्स यांना दिला असुन प्रशिक्षण केंद्र अधिकृत असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात सादर केले नाही.

2) सनी इन्फोटेक्स यांना प्रशिक्षणाकरीता आदेश दिले असुन सदर संस्थेने तालुका स्तरावरील संस्थेच्या नावासह व हमीपत्रासह यादी दिलेली नाही. त्यामुळे सदर संस्थेची संपुर्ण जिल्हयात 269 लाभार्थी प्रशिक्षण देण्याची क्षमता असल्याबाबत खात्री पटत नाही.

3) सर्वसाधारण सभेमध्ये 269 लाभार्थीची निवड करण्यात आली, या निवड केलेल्या लाभार्थ्यांना कोणत्या केंद्रात प्रशिक्षणाकरीता प्रवेश दिला. व कोणत्या केद्रात प्रशिक्षण दिले. याबाबत माहिती लेखापरीक्षणास सादर झाली नाही.

4) प्रशिक्षण झालेल्या मुलीमधुन किती मुली उत्तीर्ण झाल्या याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

5) एकुण 269 लाभार्थ्यांचे प्रशिक्षण केव्हा सुरु झाले व केव्हा संपले. याचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

6) अपंग व्यंक्तीं हक्काचे सरंक्षण अधिनियम 1995 तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परीपत्रक क्रमांक अपंग/2011/प्रक्रं01/सुधार03, दिनांक 07/01/2001 व ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपी.ए.2013/प्र.क्र.76/पं.रा.01, दिनांक 24/01/2014 अन्वये अपंगांसाठी 3 टक्के जागा राखुन ठेवणे बंधनकारक होते. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

7) सदर योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर झाला नाही. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला असे म्हणता येणार नाही.

8) ई निवीदा प्रसिध्दी तिसरी निवीदा यामध्ये अट क्र. 14 मध्ये प्रशिक्षणाचा आदेश दिल्या नंतर आगाऊ रक्कम प्रथम अदा करण्यात येईल. ही अट नव्याने टाकण्यात आली. पुढे त्यानुसार कामाचा आदेश देतांना सदरची अट कायम करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही प्रकारची लाभार्थी निवड नसतांना 50 टक्के रक्कम अदा करण्यात आल्याचे आढळून आले. दिनांक 31/03/2016 टिपणी पत्रानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी लाभार्थी प्रवेश निश्चितीनुसार कार्यवाही करण्यात यावी. असे नमुद केले आहे. यापुढे टिपणी उपलब्ध नाही. सबब प्रत्यक्षात लाभार्थी ठरलेले नसतांना लाभार्थी यादी मंजुर नसतांना देयके पारीत करण्यात आल्याचे आढळून येते.

9) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांचे पत्र क्रमांक 1036, दिनांक 23/05/2016 अन्वये 169 लाभार्थींची यादी पाठविण्यात आली. सदर पत्रानुसार एकाच घरातील दोन लाभार्थ्यांना लाभ देण्यात येवू नये, असे आढळल्यास फक्त एकाच नावास मान्यता देण्यात येईल, असे स्पष्टपणे नमुद केले आहे. परंतु सदर यादीचे अवलोकन केले असता 13 एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिल्याचे दिसून येते.

10) एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण लाभार्थी अर्ज, रुजु अहवाल, हजेरीपट, प्रशिक्षण कालावधी, उत्तीर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्रे, तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे, लेखापरिक्षण तपासणीस उपलब्ध झालेली नाही.

**3.883 इयत्ता 10 वी व 12 वी पास मुलींकरीता C.C.C. संगणक प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,86,565/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीअे2013/प्रक्रं76/पंरा-1, दिनांक 21/01/2014 मधील परीच्छेद 04 अन्वये या योजनेचा लाभ दारीद्रय रेषेखालील कुटूंब तसेच ज्या कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न रुपये 50,000/- पर्यंत असलेल्या कुटूंबातील मुलींना प्राधान्याने देण्यात यावा, असे नमुद आहे. सदर प्रशिक्षणाचा आदेश ॲस्पेक्ट आय. टी. आय. अमरावती यांना दिला असुन प्रशिक्षण केंद्र अधिकृत असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात सादर केले नाही.

2) ॲस्पेक्ट आय.टी.आय. यांना प्रशिक्षणाकरीता आदेश दिले असुन सदर संस्थेने तालुका स्तरावरील संस्थेच्या नावासह व हमीपत्रासह यादी दिलेली नाही. त्यामुळे सदर संस्थेची संपुर्ण जिल्हयात 730 लाभार्थी प्रशिक्षण देण्याची क्षमता असल्याबाबत खात्री पटत नाही.

3) सर्वसाधारण सभेमध्ये 730 लाभार्थी निवड केली आहे. या निवड केलेल्या लाभार्थ्यांना कोणत्या केंद्रात प्रशिक्षणाकरीता प्रवेश दिला व कोणत्या केद्रात प्रशिक्षण दिले. याबाबत माहिती लेखापरीक्षणास सादर झाली नाही.

4) प्रशिक्षण झालेल्या मुलींमधून किती मुली उर्त्तीण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

5) एकुण 730 लाभार्थ्यांचे प्रशिक्षण केव्हा सुरु झाले व केव्हा संपले ? याचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

6) अपंग व्यक्ती हक्काचे सरंक्षण अधिनियम 1995 तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्यायविशेष सहाय्य विभाग, शासन परीपत्रक क्रमांक अपंग/2011/प्रक्रं01/सुधार03, दिनांक 07/01/2001 व ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी.ए.2013/प्र.क्र.76/पं.रा.01, दिनांक 24/01/2014 अन्वये अपंगांसाठी 3 टक्के राखुन ठेवणे बंधनकारक होते. परंतु, तशी कार्यवाही केली नाही.

7) सदर योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर झाला नाही. त्यामुळे योजना राबविण्याचा उददेश सफल झाला असे म्हंणता येणार नाही.

8) C.C.C. प्रशिक्षण लाभार्थी अर्ज, रुजु अहवाल, हजेरी पट, प्रशिक्षण कालावधी, उत्तीर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्रे, तसेच उपयोगीता प्रमाणपत्रे, लेखा परिक्षण तपासणीस उपलब्ध झालेली नाही.

9) महिला व बालकल्याण विभाग पत्र क्रमांक 507/2016, दिनांक 29/03/2016 अन्वये संस्थेने सदर दिनांकापावेतो संबंधीत लाभार्थ्यांना संगणक C.C.C.प्रशिक्षणाला प्रवेश दिल्याचे आवेदन पत्र या कार्यालयाला सादर केले नाहीत. त्याचप्रमाणे विदयार्थी संख्येनुसार प्रमाणपत्रे या कार्यालयाला सादर केले नाही, असे नमुद आहे. यावरुन प्रत्यक्षात प्रशिक्षण कार्यक्रम राबविला गेला किंवा कसे ? याबाबत खात्री होत नाही.

10) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194-C नुसार 2 टक्के आयकर रूपये 13,732/- संबंधीताचे देयकातून कपात करुन शासन खाती भरणा केलेला नाही.

**3.884 अंगणवाडी केद्रांना बस्करपटटी पुरविणे खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत रक्कम रूपये 9,99,243 /- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अंगणवाडींना बस्करपटटी पुरविणे नस्तीची तपासणी केली असता महिला व बालकल्याण समितीची सभा दिनांक 18/09/2015 च्या विषय क्रमांक 21 नुसार विविध साहित्य पुरविणे अंतर्गत बस्करपटटी पुरविण्याबाबत

मंजुरी घेण्यात आली आहे. तसेच करारनामा करण्यात आला आहे. सदर नस्तीची व देयकाची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) करारनाम्याची तपासणी केली असता करारनाम्यावर पणन अधिकारी व महिला बालविकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. परंतु, करारनामा केव्हा केला याबाबत दिनांक नमुद करण्यात आला नाही.

2) पुरवठा आदेशाप्रमाणे बस्करपट्टीचा पुरवठा प्रकल्प कार्यालय स्तरावर त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे संख्येचे प्रमाणात पुरवठा करण्यात यावा. असे असतांना अकोला ग्रामीण 1 व 2 यांचेकडील साठापुस्तक तपासणीस उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे त्यांना प्राप्त बस्करपटटीची तपासणी करता आली नाही..

3) नस्तीला अंगणवाडीला बस्करपट्टी खरेदीबाबत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेशाची प्रत असुन त्यावर उप मख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असुन त्यावर आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही.

4) प्रकल्प स्तरावरील साठा पुस्तकांची तपासणी केली असता साहित्याची डिलेव्हरी दिनांक 30/03/2016 ला झाली असता प्रकल्प स्तरावरून अंगणवाडींना साहित्य माहे जुन 2016 ला विलंबाने वाटप केल्याचे आढळते.

5) प्रकल्प स्तरावरून अंगणवाडींना सतरंजी वाटप केल्यानंतर त्यांचेकडून उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाहीत.

6) बस्करपट्टी मागणी व पुरवठा बाबत नस्तीची तपासणी केली असता पंचायत समिती प्रकल्पस्तर मागणी कमी असता पुरवठा जादा करण्यात आला. जादा पुरवठा केलेल्या बस्करपट्ट्या प्रती नग रुपये 189/- प्रमाणे 1113 = रुपये 2,10,357/- खर्चाची आवश्यकता नसतांना अनावश्यक खर्चाबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

**3.885 महिलांसाठी समुपदेशन केद्रं चालविणे खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाच समुपदेशन केंद्रांनी त्यांचे एप्रिल 2015 ते मार्च 2016 पर्यंतचे खर्चाचे अहवाल सादर करावयाचे असतांना त्यांनी माहे एप्रिल 2015 ते फेब्रुवारी 2016 पर्यंत खर्चाचे अहवाल सादर केल्याचे आढळते. मार्च 2016 चे खर्चाचे अहवाल नसतांना मानधनाची रक्कम कशाचे आधारे खर्च केली?

2) प्रकल्प अधिकारी यांनी समुपदेशन केंद्राची तपासणी करून अहवाल सादर करावयाचे असतांना तालुका समुपदेशन केंद्र बार्शीटाकळी यांचा एका वर्षात किती प्रकरणे निकाली काढण्यात आली? याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

3) त्रैमासीक कार्य अहवाल फक्त तालुका समुपदेशन केंद्र पंचायत समिती, पातुर यांच्या नस्तीला असुन इतर चार समुपदेशन केंद्राचा त्रैमासीक अहवाल नस्तीला नाही. सदर अहवाल अप्राप्त आहेत.

4) समुपदेशन केंद्र पातुर, बाळापुर,बार्शीटाकळी, माता रमाई यांनी स्टेशनरी खर्च, बैठक खर्च, जनरल खर्च कशाचे आधारे दर्शविला आहे?

5) अर्धसमास पत्र क्रमांक 3 दिनांक 16/11/2016 अन्वये समुपदेशन केंद्राचे तिमाही कार्य अहवाल, प्राप्त झालेले तक्रार अर्जाची नोंदवही, रोखवही, प्राप्त झालेले तक्रार अर्ज व त्यावर केलेली कार्यवाही नस्ती लेखापरिक्षणास मागणी करण्यात आली असता उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे उपरोक्त अभिलेख्याची तपासणी करता आली नाही.

6) सदर योजनाचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही.

**3.886 जिल्हा परिषद सेस (उपकर) अंजदाजपत्रकाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे मुळ अंदाजपत्रक हे रुपये 50,00,000/- असुन सुधारीत अंदाजपत्रक रुपये 54,00,000/- चे करणेत आले. परंतु, त्यानुसार खर्च करणेत

आल्याचे दिसुन येत नाही. सदर वित्तीय वर्षात रुपये 1,99,909/- खर्च झाला असुन रुपये 52,00,091/- ची तरतुद योग्य नियोजन न केल्यामुळे निधी अखर्चित असल्याचे दिसुन आले.

2) महाराष्ट्र अर्थसंकल्प् नियम 37 व 38 नुसार अर्थसंकल्प् अंदाजपत्रक अचुकपणे तयार करणेत येवुन याप्रमाणे खर्च करणे आवश्य्क असतांना सदरचे अचुकतेबाबत योग्य् औचित्य साधले गेले नसल्याने वित्तीय अनियमितता झालेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2007/ प्र.क्र.4871/वित्त्-3, दिनांक 05/10/2012 अन्वये अपंगाच्या कल्याण व पुर्नवसनाकरिता अपंग कल्याण कृती आराखडानुसार स्व:निधीतुन योजनेची अंमलबजावणी करतांना 3 टक्के अपंगाकरिता तरतुद करुन योजना राबविण्याबाबत आदेशित केले असतांना तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) जिल्हा निधीचे एकुण उत्पन्न् व 10 टक्के तरतुद करण्यासंबंधी करावयाची तरतुद झालेला खर्च, तसेच शिल्ल्क अनुशेष यासंबधी नोंदवही ठेवलेली आढळुन आली नाही.

**3.887 शुभेच्छा जाहीरात खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1051 दिनांक 04/03/2016 अन्वये रक्कम रूपये 15,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-10.00/प्र.क्र.56/2000/वित्तिय सुधारणा दिनांक 10/09/2001 नुसार खर्चामध्ये काटकसर करणेबाबतचे धोरण अवलंबिले असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीक्रवी-2010/प्रक्र. 128/34 दिनांक 08/04/2010 नुसार अस्तित्वात असलेली वृत्तपत्रे नियतकालीके यांच्या जाहीरात दरात दरवाढ/श्रेणीवाढ करण्यात आली आहे. त्यानुसार दैनिक मतदार कॉ.सेमी दर रूपये 67.00/- व चौ.सेमी दर रूपये 17.00/- असतांना सदर बीजकावर दर नमुद नाही. त्यामुळे रूपये 15,000/- कोणत्या दरानी देण्यात आले? यांची शहानिशा होवु शकली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 07 दिनांक 22/09/2016 नुसार विचारणा करण्यात आली. परंतु, याबाबत दस्तऐवज सादर करण्यात आले नाही.

**3.888 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील महिलांना पिको / शिलाई मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 29,23,760/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदेच्या अटी शती मधील अट क्रमांक 14 नुसार सुरक्षा ठेव भरणा व करारनामा केल्याशिवाय पुरवठा देण्यात येणार नाही. परंतु करारनामा दिनांक 14/03/2016 रोजी केला असतांना पुरवठा आदेश दिनांक 23/02/2016 रोजी देण्यात आला.

2) पंचायत समिती दारव्हाला डिएम क्रमांक व दिनांक नसलेल्या नुसार 23 नग शिलाई मशिन पुरवठा करण्यात आला, तसेच त्यावर पंचायतमध्ये प्राप्त साहित्य दिनांक नमुद नाही. त्यामुळे पंचायतीस कोणत्या दिनाकांस साहित्य प्राप्त झाले याबाबत तपासणी करता आली नाही.

3) शासन निर्णय क्रमांक झेडपीए 25013/प्र.क्र.76/परा, दिनांक 24/01/2014 नुसार महिला व बालकल्याण समितीने योजना राबवितांना योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिध्दी देवून प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राधान्याने लाभ देणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारचे कार्यवाही करण्यात आली नाही.

4) देयकावर किंवा डीएम पिको शिलाई मशिनचा बॅच क्रमांक उत्पादन दिनांक नमुद नाही.

5) पंचायत समिती स्तरावर सदर शिलाई मशिन वाटप केल्याबाबतचे साठा रजिस्टर सादर केले नाही. त्यामुळे साहित्य विनियोग बाबत तपासणी करता आली नाही.

**3.889 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,98,800/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बालविकास योजना प्रकल्पाकडुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, यवतमाळ यांना प्रशिक्षण घेवू इच्छिना-या विद्यार्थाचे अर्ज प्राप्त होतात. सदर प्रशिक्षण प्रत्येक वर्षी प्राप्त निधी अनुदानानुसार राबविल्या जात असल्याने प्रकल्प स्तरावर अर्ज सादर करतांना त्यासोबत यापूर्वी त्या लाभार्थीचे सदर योजनेचा कोणत्याही योजनेतुन लाभ घेतला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

2) प्रकल्प स्तरावर वर्षनिहाय लाभार्थी ची नांव व गावनिहाय मास्टर रजिस्टर / नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. जेणे करुन एखाद्या लाभार्थ्याला दुबार लाभ मिळणार नाही.

3) तालुकानिहाय बाभुळगांव 8, महागांव 5, पुसद 45, दिग्रस 3, उमरखेड 2, घाटंजी 85, दारव्हा 87, नेर 2, झरी 14, आर्णी 9, यवतमाळ 63, पांढरकवडा 1 असे एकुण 328 पात्र लाभार्थीना लाभ देण्याबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक 4(1) विषय क्रमांक 4, दिनांक 14/12/2015 अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली. परंतु कोणत्या संस्थेत कोणत्या विद्यार्थीनी ॲडमिशन घेतली याबाबतची प्रवेश पावती कॉम्प्युटर संस्थेकडुन घेण्यात आली नाही. त्यामुळे ठरावानुसार नमुद पात्र पूर्ण लाभार्थीनी प्रवेश घेतला किंवा कसे याबाबात तपासणी करता आली नाही. सबब मंजुर लाभार्थीना प्रवेश घेतल्याबाबात संस्थेची प्रवेश पावती सादर करावी. संस्थेकडुन फक्त संबंधीत विद्यार्थीना द्यावयाचे प्रवेशाबाबत संमतीपत्र घेण्यात आले आहे.

4) संचालक नागेश कॉम्प्युटर सेंटर, पुसद यांनी 45 विद्यार्थ्यांचे MS-CIT प्रशिक्षण पुर्ण होवुन त्या परिक्षा पास झाल्या आहेत. त्यामुळे 40 टक्के प्रशिक्षणाचे देयक अदा करण्यात आले आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता संबधीत विद्यार्थी MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाले नसुन त्यांचे Appearing Certificate जोडण्यात आले आहे. परिक्षा उत्तीर्ण झाले नसतांना Appearing Certificate वर 40 टक्के रक्कमेचे शोधन कसे काय करण्यात आले.

**3.890 विशेष घटक योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविणे.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीची तपासणी केली असता 297 अंगणवाडी केंद्र यांना अद्यापपर्यंत जलशुध्दीकरण यंत्र पुरविले आले नसल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्षात वैद्य इंडस्ट्रीज नागपूर यांचेकडुन 500 नग जलशुध्दीकरण यंत्र खरेदी केल्याचे दिसते. आवश्यकतेपेक्षा जादा जलशुध्दीकरण यंत्र खरेदीबाबत खुलासा करावा.

2) 16 प्रकल्पनिहाय एकूण 297 अंगणवाडी केंद्र कोणती याबाबत नस्तीची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे डी.एम नुसार प्रकल्पनिहाय केलेला जलशुध्दीकरण यंत्राचा पुरवठा योग्य असल्याचे प्रमाणीत करता येत नाही.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 नुसार जलशुध्दीकरण यंत्र चांगल्या प्रतीचे प्राप्त झाल्याबाबतचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारचे प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

4) प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी केंद्राना जलशुध्दीकरण यंत्र वाटप केल्याबाबत अंगणवाडी सेविकांनी साठा पुस्तकात नोंद घेवुन जलशुध्दीकरण यंत्राद्वारे वापरलेले पिण्याचे पाणी योग्य असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही.

5) जलशुध्दीकरण यंत्र यामध्ये वापरण्यात येणाऱ्या पाण्याचे पुर्व पाणी नमुना व जलशुध्दीकरण यंत्रामध्ये पाणी टाकल्यानंतर झालेल्या पाण्याच्या शुध्दीकरणाच्या नमुना सुक्ष्मजिवजंतु प्रयोगशाळा यांचेकडे तपासणी करुन

पाणी नमुन्याचा अहवाल प्राप्त करुन घेतला नाही. त्यामुळे पाण्यात असलेले जीवजंतु (जीवाणू) किती प्रमाणात नस्ष्ट झाले यांची चाचणी अंती तपासणी करता आली नाही.

**3.891 जिल्हा परिषद सेस फंड 2015-16 अंतर्गत ग्रामीण भागातील मुलींना लेडीज सायकल पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1017, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,99,700/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद, महिला बालकल्याण विभाग, बुलडाणा यांनी जिल्हा परिषद सेस अंतर्गत 3,00,000/- रुपयांची अंदाजपत्रकीय तरतुद करुन HERO कंपनीची 20 इंची लेडीज सायकल पुरविणे ही योजना राबविली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला बालकल्याण विषय समिती, जिल्हा परिषद बुलडाणा यांची सभा दिनांक 24/08/2015 ठराव क्रमांक 5(6) अन्वये इयत्ता 5 वा वर्ग ते 12 वी पर्यत च्या मुलींना सायकली पुरविणे या योजनेस सभेने मंजुरी दिली. प्रशासकीय मंजुरी देतांना सर्वसाधारणपणे ही योजना 10 टक्के लोकवाट्यावर राबवावी तसेच योजना राबविताना सदर योजनेची रक्कम 3 लक्ष रुपयेचे वर जात असल्यामुळे ई-टेडरींग करुन सायकलची खरेदी करावी. तसेच तांत्रिक मान्यता देताना याच अटीचा समावेश करुन (उदा 10 टक्के लोकवाट्यावर ही योजना राबवावी व ई-टेडरींग प्रक्रीया करुन खरेदी करावी) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान केली. लाभार्थी हिस्सा जमा करुन खरेदी करणे आावश्यक असतांना तशी कार्यवाही विभागाने केली नाही. केवळ ई-टेंडरींग खरेदी न करणेसाठीच विभागाने अशी कार्यवाही केल्याचे दिसते.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 2014/प्र.क्र.82/भाग iii/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 3.2.3 मध्ये दरपत्राकाचे आधारे खरेदी करतांना संबंधीत निवीदाधारकाकडुन VAT/CST क्रमांक घेण्यात यावा तसेच पॅन कार्ड घेणे बंधनकारक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही. योजनेची किंतम 3 लक्ष ठरवुन तीन स्थानिक दरपत्रके बोलवली, परंतु नस्तीची तपासणी केली असता दिनांक 11/03/2016 च्या जाहीर सुचनेनुसार दरपत्रके बोलावली ती दरपत्रके केव्हा प्राप्त झाली, केव्हा उघडली, कोणा समोर उघडली यांचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1084/सी आर/ 1622/प्र.क्र.197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असतांना सुचनाचे पालन करण्यात आले नाही.

4) सदर योजना 10 टक्के लोकवाट्यावर असल्यामुळे वरील किंमतीनुसार जिल्हा परिषद हिस्यानुसार रुपये 3,330/- प्रति सायकल याप्रमाणे एकुण 90 सायकली खरेदी करणेसाठी पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु विभागाने तसे न करता रुपये 3,700/- प्रति नग प्रमाणे लाभार्थी हिश्यासह संबंधीत पुरवठाधारकास प्रदान केले. त्यामुळे एकुण रुपये 26,730/- लाभार्थी हिस्सा हा लाभार्थ्याकडुन न घेता स्वता: भरला यासाठी संबंधीत विभागाने दिनांक 24/01/2015 च्या शासन निर्णयातील तरतुदीचा आधार देवुन वरील लाभार्थी हिस्सा वसुल केला नाही. परंतु तांत्रिक मान्यता आदेश सुध्दा यांच अटीचा म्हणजे 10 टक्के लोकवाट्यावर योजना राबविणे आवश्यक असतांना तशी न राबविल्यामुळे रुपये 26,730/- जिल्हा परिषद चे स्व उत्पन्नाचे नुकसान झाले आहे. याची वसुली होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रक आखुन देण्यात आलेले आहे. परंतु याबाबीकडे सुध्दा दुर्लक्ष करण्यात आले. सदर योजनेत एकुण 81 सायकल खरेदी केल्या आहेत. परंतु लेखापरीक्षण दिनांका पर्यत एकही सायकल वाटप करण्यात आली नाही. म्हणजे लाभार्थी निवड न करता योजना राबविली आहे व एवढ्या मोठ्या प्रमाणावर खरेदी केली आहे. साधारणपणे एक ते सव्वा वर्ष सर्व साहित्य तसेच पडुन आहे. त्यामुळे खर्च केलेले

एकुण रुपये 2,99,700/- कोणताही फायदा लाभार्थ्यांला झाला नाही. याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. त्यामुळे योजनेचा योग्य परीणाम दिसून आला नाही.

6) खरेदी केलल्या साहित्याची तपासणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडुन करुन घेणे आवश्यक असतांना तशी तपासणी करण्यात आली नाही.

**3.892 विशेष घटक योजनेअंतर्गत अंगणवाडी मुलामुलींकरीता स्टील ग्लास पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 3295, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 19,99,998/- खर्च करण्यात आला आहे.

विशेष घटक योजनेअंतर्गत अंगणवाडीतील मुलामुलींकरीता स्टिल ग्लास पुरविणे योजना राबविण्यात आली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना 600 ml चा स्टील ग्लास पुरविणे योजना राबविण्यात आली. सदर साहित्य खरेदी DGS&D चे दरकरारानुसार मे. वैद्य इडंस्ट्रीज नागपुर यांचेकडुन करण्यात आली सर्व साधारपणे अंगणवाडी केंद्रांतील मुले ही 3 ते 6 वर्ष वयोगटातील असतांत व त्याचे दररोजच्या आहारानुसार एका वेळी सर्वसाधारणपणे 100 ते 150 ग्राम आहार व एका वेळेस 100 ते 200 ML पिण्यासाठी पाणी आवश्यक आहे. सदर प्रकरणी खरेदी केलेले ग्लास 3 ते 6 या वयोगटासाठी आवश्यक आहे. याबाबत तांत्रिक अधिका-याचे कोणतेच अहवाल लेखापरीक्षणात पहावयास मिळाले नाही. त्यानुसार सर्वसाधारणपणे 300 ML चा ग्लास त्याना आवश्यक आहे. परंतु विभागाने खरेदी करतांना 600 ml चा गलास खरेदी केला आहे. जो आवश्यकतेनुसार खुप मोठा व अनावश्यक आहे. 300 ml ग्लास ची किंमत रुपये 33.60 प्रति नग दिलेली आहे. परंतु विभागाने 600 ml ग्लास रुपये 54.60 प्रमाणे खरेदी केले असे एकुण 36,630 नग खरेदी केले आहे. त्यामुळे प्रति ग्लास मागे रुपये 21/- अनावश्यक खर्च केला आहे. त्यामुळे एकुण रुपये 7,69,230/- आवश्यकता नसतांना प्रदान केले आहे, याची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.893 विशेष घटक योजने अंतर्गत सन 2014 -15 मधील तरतुदीनुसार अंगणवाडी केंद्रांतील मुलामुलींकरीता डेक्स बेंच पुरविणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 3299, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 19,88,010/- खर्च करण्यात आला आहे.

सन 2014-15 या वित्तीय वर्षातील विशेष घटक योजने अंतर्गत अखर्चित रक्कम सन 2015-16 मध्ये खर्च करण्यात आली. सदर योजने अंतर्गत अंगणवाडीतील मुलांकरीता डेक्स बेंच खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना डेक्स बेंच (Dual desk bench for two student) पुरविणे योजना राबविण्यात आली, सदर साहित्य खरेदी हि DGS&D चे दरकरारानुसार मे वैद्य इडंस्ट्रीज नागपुर यांचेकडुन करण्यात आली. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 2014/प्र.क्र.82/भाग iii/उद्योग 4, दिनांक 15/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 5.14 अंध अपंग यांच्या संस्थांकडुन सरद डेक्स बेंच खरेदी करणे आवश्यक होते. या शासन निर्णयातील परिशिष्ट 18 नुसार सदर खरेदी ही महारोगी सेवा समिती आंनदवन, वरोरा, जिल्हा चंद्रपुर यांचेकडुन व महारष्ट्र राज्य, लघुउद्योग विकास महामंडळ मार्फत करण्यात येईल. सन 2015-16 या वित्तीय वर्षासाठी महारष्ट्र राज्य, लघुउद्योग विकास महामंडळ यांचा दरकरार अस्थित्वात होता. त्यानुसार याच प्रकारचा डेक्स बेंच रुपये 5,154/- (उच्च दर व उच्च दर्जा चे) किंमत निश्चित केलेली होती व जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत याच दरकरारानुसार खरेदी करण्यात आली होती. परंतु विभागाने तशी कार्यवाही न करता DGS&D चे दरकरारानुसार मे वैद्य इडंस्ट्रीज नागपुर यांचेकडुन रुपये 5,400/- प्रमाणे खरेदी केली. त्यामुळे प्रत्येक नगा मागे रुपये 246/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे. असे एकुण 370 नगाप्रमाणे एकुण रुपये 91,020/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे, याची वसुली होणे आवश्यक आहे.

2) पुरवठा आदेशातील तरतुदीनुसार सदर साहित्य हे 31 मार्च चे आत पुरवठा करण्याचे आदेश दिले आहे. सदर पुरवठा हा विहीत कालावधीत न केल्यास ½ टक्के दंडाची तरतुद करण्यात आली आहे. प्रकल्प स्तरावरील व अंगणवाडी स्तरावरील साठा नोंदवह्यांची तपासणी केली असता सदर साहित्य हे प्राप्त झाले आहे.

सदर साहित्य हे किमाण 5 आठवडे उशीराने प्राप्त झालेले आहे. परंतु विभागाने सदर साहित्य 31 मार्च रोजी प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे व त्याच दिनांकास देयकाचे प्रदान केले आहे. परंतु दंड कपात करणे आवश्यक असतांना दंड कपात केला नाही. 5 आठवडयाचा दंड रुपये 48,700/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.894 ओ टी एस पी अंतर्गत अंगणवाडी केंद्रांतील मुलामुलींकरीता डेक्स बेंच पुरविणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 3302, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 24,71,580/- खर्च करण्यात आला आहे.

सन 2014-15 या वित्तीय वर्षातील विशेष घटक योजने अंतर्गत अखर्चित रक्कम सन 2015-16 मध्ये खर्च करण्यात आली. सदर योजने अंतर्गत अंगणवाडीतील मुलांकरीता डेक्स बेंच खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना डेक्स बेंच (Dual desk bench for two student) पुरविणे योजना राबविण्यात आली, सदर साहित्य खरेदी हि DGS&D चे दरकरारानुसार मे वैद्य इडंस्ट्रीज नागपुर यांचेकडुन करण्यात आली. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 2014/प्र.क्र.82/ भाग iii/ उद्योग 4, दिनांक 15/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 5.14 अंध अपंग यांच्या संस्थांकडुन सरद डेक्स बेंच खरेदी करणे आवश्यक होते. या शासन निर्णयातील परिशिष्ट 18 नुसार सदर खरेदी ही महारोगी सेवा समिती आंनदवन, वरोरा, जिल्हा चंद्रपुर यांचेकडुन व महारष्ट्र राज्य, लघुउद्योग विकास महामंडळ मार्फत करण्यात येईल सन 2015-16 या वित्तीय वर्षासाठी महारष्ट्र राज्य, लघुउद्योग विकास महामंडळ यांचा दरकरार अस्तित्वात होता. त्यानुसार याच प्रकारचा डेक्स बेंच रुपये 5,154/- (उच्च दर व उच्च दर्जाचे) किंमत निश्चित केलेली होती व जिल्हा परिषद बुलडाणा अंतर्गत याच दरकरारानुसार खरेदी करण्यात आली होती. परंतु विभागाने तशी कार्यवाही न करता DGS&D चे दरकरारानुसार मे वैद्य इडंस्ट्रीज नागपुर यांचेकडुन रुपये 5,400/- प्रमाणे खरेदी केली. त्यामुळे प्रत्येक नगा मागे रुपये 246/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे, असे एकुण नग 460 प्रमाणे एकुण रुपये 1,13,160/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे, याची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.895 विशेष घटक योजने अंतर्गत अंगणवाडीतील मुलामुलींकरीता प्रोटीन फुड पावडर खरेदी योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 5494, दिनांक 28/03/2016 अन्वये रक्कम रुपये 29,99,987/- खर्च करण्यात आला आहे.

सदर योजना विशेष घटक योजने अंतर्गत राबविण्यात आली असुन अंगणवाडीतील अनुसुचीत जातीच्या मुलामुलींकरीता प्रोटीन पावडर पुरविण्यात आले आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विशेष घटक योजनेतील मार्गदर्शक तत्वानुसार सदर योजना ही अनुसुचीत जातीच्या लाभार्थ्यांकरीता असुन योजनेचा लाभ अनुसुचित जातीच्या मुलामुलींकरीता होणे अपेक्षीत आहे. या योजनेत अंगणवाडीतील मुलामुलींचे शारीरीक पालन पोषण योग्य पध्दतीने होण्याचे दृष्टीने राबविण्यात आली. सदर योजनेत प्रति मुलाला आठवड्यातुन दोन वेळेस 5-5 ग्रॅम प्रोटीन पावडर 12 आठवड्या पर्यंत देण्यात येते. त्यानुसार सर्वसाधारणपणे एका मुलाला 12 आठवड्यात 120 ग्रॅम म्हणजे एका मुलाला 1 पॅकेट याप्रमाणे अंगणवाडीत अनुसुचीत जातीचे मुलाची संख्या लक्षात घेवुन पुरवठा आदेश देणे आवश्यक होते. परंतु तसे न करता योजनेतील एकुण 30 लक्ष रुपये तरतुद लक्षात घेऊन मोघम स्वरुपात योजनेचा पुरवठा आदेश देण्यात आला.

2) महिला बालकल्याण विभागा अंतर्गत जिल्हा परिषद, बुलडाणा 3 ते 6 वर्षा पर्यतची 86,644 मुले मुली आहेत. त्यात अनुसुचित जमाती संवर्गातील 14,971 मुले मुली, अनुसुचित जाती संवर्गातील 17,327 मुले मुली व इतर संवर्गातील 54,349 मुले मुली आहेत. सदर योजना ही अनुसचित जातीच्या विदयार्थ्यांसाठी असुन मुलामुलींची संख्या 17,327 आहे. विहीत केलेल्या प्रोटीन पावडरच्या मात्रे नुसार प्रत्येक विदयार्थ्यासाठी 1 पॅकेट या प्रमाणे खरेदी करणे आवश्यक होते. त्यानुसारच एकुण 17,327 पॅकेटचा पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना 49,164 पॅकेटचा पुरवठा आदेश देण्यात आला यावरुन 31,837 पॅकेट जादा खरेदी करण्यात आले. ज्यादा खरेदी केलेल्या पावडरवर एकुण रुपये 19,42,693/- खर्च करण्यात आले याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**3.896 विशेष घटक योजने अंतर्गत अंगणवाडीतील मुलामुली करीता अंगणवाडी स्तरावर ग्रिनबोर्ड पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक दिनांक 31/3/2016 अन्वये रक्कम रुपये 29,81,407/- खर्च करण्यात आला आहे.

अंगणवाडी केद्रांना Green Writing Bord 900mm * 200 mm 778 नग अंगणवाडी स्तरावर पुरविण्यात आले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील तरतुदीनुसार सदर साहित्य हे पुरवठा आदेशापासुन 45 दिवसात आत पुरवठा करण्याचे आदेश दिले आहे. सदर पुरवठा हा विहीत कालावधीत न केल्यास ½ टक्के दंडाची तरतुद करण्यात आली आहे. प्रकल्प स्तरावरील व अंगणवाडी स्तरावरील साठा नोंदवहयांची तपासणी केली असाता सदर साहित्य प्राप्त झाले आहे.

2) वरील बाबी पाहता सदर साहित्य हे किमाण 6 आठवडे उशीराने प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सर्वसाधारणपणे याच कालावधीत सर्व साहित्य प्राप्त झाले आहे. परंतु विभागाने सदर साहित्य 31 मार्च रोजी प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे व त्याच दिनांकास देयकाचे प्रदान केले आहे. परंतु दंड रुपये 1,49,070/- कपात करणे आवश्यक असतांना दंड कपात केला नाही. त्याची वसुली होणे आवश्यक आहे.

3) विभागाने 31 मार्च पर्यंत माल मिळाला नसतांना प्रक्ल्प स्तरावरील Dilevary challan चे आधारे सदर माल 31 मार्च पुर्वी मिळाल्याचे दर्शविले व 31 मार्च रोजी देयके पास करुन संबंधीतास प्रदान केले प्रत्यक्षात माल हा अंगणवाडी स्तराव पोहचविणेची अट पुरवठा धारकास देण्यात आली होती. त्याचे सोयीनुसार त्यानी माल पोहच केला. विभागाने अंगणवाडी स्तरावरील साठा नोंदवहया तपासुन देयके पारीत करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यावाही केली नाही. कोणत्या प्राधिकारान्वये माल प्राप्त होण्याचे आधी देयके पारीत केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.897 भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबविणे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** आदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 नुसार दिनांक 01/12/2015 पासून रामटेक तालुक्यातील 490 गरोदर व स्तनदा मातांना अमृत आहार योजनेचा लाभ देणेकरीता आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त यांचे आदेश जावक क्रमांक एबाविसयो/अ.सं.ग.स्त.मा./भा.र.डॉ.एपीजेक/ अनुदान/3436/2015-16, दिनांक 11/12/2015 नुसार नागपूर जिल्हयास रुपये 9,37,000/- तरतुद प्राप्त झाली असून प्रमाणक क्रमांक 964, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 5,00,000/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निधी वितरन आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर दिनांक 31/03/2016 अन्वये एकूण 5 लक्ष निधी वितरीत करणेत आला असून एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, रामटेक अंतर्गत OTSP अंतर्गत अनुसुचीत क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी एकूण रुपये 4,31,250/- खर्चाची आवश्यकता असलेचे आढळते. तरी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांचेमार्फत सन 2015-16 मध्ये एकूण रुपये 9,37,000/- इतकी तरतुद प्राप्त झाली असून आदिवासी विकास विभाग यांचे

शुध्दीपत्रक क्रमांक आविवि 2015/प्र.क्र.78/का-8, दिनांक 30/11/2015 अन्वये OTSP जिल्हा नागपूर मधील रामटेक तालुक्यातील 97 गावांची निवड करणेत येवून खर्च करणे आवश्यक असतांना बालविकास प्रकल्प अधिकारी, रामटेक यांचे पत्र क्रमांक एबाविसेयो/विअ(सां.)/175/16, दिनांक 01/03/2016 चे अनुदान मिळणे बाबतचे पत्रानुसार रामटेक अंतर्गत माहे डिसेंबर 2015 ते जानेवारी 2016 पर्यंत रुपये 6,08,450/- इतका खर्च करणेत आला असून तरतुद रुपये 3,28,550/- शिल्लक असलेचे आढळते व उर्वरीत फेब्रुवारी 2016 ते मार्च 2016 साठी एवढाच खर्च अपेक्षीत असलेचे नमुद आहे. एकूण रुपये 4,31,250/- इतका निधी आवश्यक असतांना रुपये 9,37,000/- खर्च करणेत आल्याचे आढळते. त्यामुळे नियमबाह्य रुपये 4,37,000/- इतका निधी खर्च करणेत आला आहे.

2) या योजनेवरील खर्चास आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांची तांत्रिक मंजूरी घेणेत आली नाही. त्यामुळे नियमबाह्यता झाली आहे.

3) सदरचे योजनेकरीता आहार खरेदीसाठी निविदा बोलावून खरेदी करणेत आली नाही.

4) आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांचे आदेश जावक क्रमांक एबाविसेयो/असंस्तमा/ भा.र.डॉ.एपीजेक/अनुदान/3436/2015-16, दिनांक 11/12/2015 नुसार रुपये 9,37,000/- इतका निधी जिल्हा परिषद नागपूरला वितरीत करणेत आला असून अट क्रमांक 5 नुसार फक्त अदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गतच खर्च करणेची अट आहे.

5) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि-2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 नुसार मार्गदर्शक तत्वे क्रमांक 8 अन्वये योजनेचे लाभार्थी निवडण्यासाठी अनुसुचीत क्षेत्रातील अंगणवाडी सेवीका व आशा यांनी लक्ष्य गटामधुन आंगणवाडी / मिनी आंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची आंगणवाडी केंद्रामध्ये नोंदणी करुन लाभार्थी यादी लेखापरीक्षणास सादर करणेत आली नाही. त्यामुळे योजनेचा लाभ योग्य लाभार्थ्यांना देण्यात आले बाबत खात्री होत नाही.

6) निधी वितरन आदेशातील अट क्रमांक 6 नुसार सदर योजनेचा झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून एकत्रित संपूर्ण उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त, बालविकास सेवा योजना यांना सादर केल्याचे आढळत नाही. त्यामुळे खर्चात नियमबाह्यता झालेचे आढळते.

**3.898 100 टक्के अनुदानावर इयत्ता 5 वी ते इयत्ता 12 वी तील मुलींना सायकल पुरविण्यासाठी अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद वर्धाच्या, समाजकल्याण विभागाने ई-निविदेनुसार वर्धा येथील मे जैन टेडर्स यांना प्रति नग रूपये 3,675/- या दरानुसार सायकल पुरवठा करण्याचा आदेश क्रमांक 581/2016, दिनांक 23/03/2016 नुसार देण्यात आला.

प्रमाणक क्रमांक 1954, दिनांक 31/03/2016 रूपये 16,97,850/- जैन टेडर्स, वर्धा उपप्रमाणक क्रमांक 111, दिनांक 31/03/2016 462 नग सायकल प्रति सायकल रूपये 3,675/- प्रमाणे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांचा अर्ज नियमानुसार आवक मधून येणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच अर्ज व त्याचे अनुषंगिक सर्व प्रमाणपत्रे एकाच कागदावर घेण्यात आले आहे. बऱ्याच अर्जावर मुख्याध्यापकांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेले विदयार्थ्यांचे शाळा व घराबाबतचे अंतर एकाच गावातील व एकाच शाळेतील कमी अधिक आहे. त्यामुळे अर्जाची छाननी व तपासणी न करताच लाभ देण्यात आला.

2) इयत्ता 5 वी ते 12 वी तील मुलींना सायकल पुरविणे योजनेअंतर्गत पंचायत समिती करंजा, देवळी, वर्धा, आर्वी, समुद्रपूर, सेलू व हिंगणघाट यांचेकडून प्राप्त झालेल्या लाभधारकांचे प्रस्तावांचे लेखापरिक्षण केले असता मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून आल्या असून अपुर्ण प्रस्तावांचे लाभार्थ्यांची निवड नियमबाह्य करणेत आलेली आहे. योजनेच्या अटी व शर्तीनुसार लाभार्थी निवड करण्यात न आल्याने नियमाधीन कार्यवाही करुन रक्कम वसूलीबाबत कार्यवाही करावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए/2008/प्र.क्र. 446/विल 9, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थी निवड 1 मे पूर्वी करणे आवश्यक असतांना 2015-16 मध्ये

राबविण्यात आली आणि सन 2016-2017 पर्यंत सुध्दा लाभार्थ्यांना सायकल वाटप सुरू होत्या, यावरून संबंधीत विभागाने शासन वेळापत्रकानुसार कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए 2006/प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 31/12/2009 नुसार रूपये 25 लक्ष खालील जाहीरात देण्याकरिता एक ब वर्ग दैनिक, एक ब वर्ग साप्ताहिक विभागस्तरीय, ब वर्ग दैनिक, एक ब वर्ग साप्ताहिक जिल्हास्तरीय मध्ये जाहीरात देणे आवश्यक असतांना कोणत्याही पेपरात जाहीरात दिल्याचे दिसून आले नाही. विभागाने ई-निविदा करिता योग्य प्रकारे जाहीरात न दिल्याने त्यांना पुरवठा दार मिळू शकला नाही.

5) शासना मार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस / एनईएफटी मार्फत करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68/कोषा प्र-5, दिनांक 18/04/2011 मधील क्रमांक ix) मागणीदारांना प्रदान करावयाची रक्कम अदा करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात येवू नये कारण प्रदान देय झाल्यानंतर मागणीदाराच्या खात्यात जमा करण्याचे उत्तरदायित्व हे त्या कार्यालय प्रमुखावर आहे. मागणीदारांवर नाही. यानुसार संबधीत विभागाने रूपये 16,12,850/- इतकी रक्कम संबंधीत पुरवठाधारकास धनादेशाने अदा करण्यात आली आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही.

6) वारंवार अर्धसमासपत्र क्रमांक 05, दिनांक 12/08/2016 देवून सुध्दा विभागाने पंचायत समिती आष्टी मंजुर यादीतील अ.क्र.6 व पंचायत समिती कारंजा यांनी मंजुर यादीतील अ.क्र.10 पंचायत समिती सेलु यांनी मंजुर यादीतील अ.क्र.01,13,28,43,50,57,58 सायकल वाटपाबाबतचे अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाही. लेखापरीक्षणास अभिलेखे सादर होणे आवश्यक आहे. अन्यथा नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्र.क्र. 565/34, दिनांक 05/10/1989 तथा दिनांक 02/09/2013 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. मास्टर नोंदवही न ठेवल्याने देवळी, पंचायत समिती मध्ये 14 लाभार्थ्यांचे अर्ज पुन्हा प्राप्त झाले होते. परंतू महिला व बालकल्याण विभागाने सर्वसाधारण सभा दिनांक 23/09/2015 विषय क्रमांक 5(2) ठराव क्रमांक 04 अन्वये नविन लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. अशाच प्रकारे इतरही पंचायत समिती मध्ये दुबार लाभ देण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संपूर्ण लाभार्थ्यांनी मागील तीन वर्षात लाभ घेतला किंवा नाही याबाबतची खात्री होणे आवश्यक आहे. तसेच दुबार प्रदान झाल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

8) शिल्लक साठा लाभार्थ्यांना वाटप करुन अनुपालन होणे आवश्यक आहे. तसेच दुस-या प्रर्वगातील लाभ द्यावयाचे असल्यास मंजुरी प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.899 90 टक्के अनुदानावर ग्रामीण महिलांना सौर कंदील पुरवठातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1153, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,88,615/- खर्च करण्यात आले आहेत.

महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परीषद भंडारा येथील सन 2015-16 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील महीलांना सौर कंदील पुरवठा करणेबाबत एकूण 7 प्रकल्पांनाकरीता महिला व बालकल्याण विभागाने सौर कंदील खरेदीवर रूपये 9,88,615/- चे खर्च दर्शविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषदेने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्याचे निदर्शनास येते.

2) सदर योजनेकरीता 3 टक्के अपंगांना सुध्दा लाभ देणे आवश्यक आहे.

3) एकुण अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देवु नये असे स्पष्ट नमुद असतांना असल्याबाबत प्रमाणपत्र पाहावयास मिळाले नाही.

4) एकाच लाभार्थ्यास एकाच योजनेतुन दोन लाभ दिलेले आहे, त्यामुळे एक लाभ अनुदेय आहे. दुसरे लाभ अनुदेय नाही संबधित लाभार्थ्याकडुन रक्कम रूपये 1,398/- चे वसुलीस पात्र ठरतात.

5) सौर कंदील खरेदी 550 नगाकरीता प्रशासकीय मंजुरी दिली असतांना सौर कंदील 745 नग खरेदी केली गेली असल्यामुळे 195 नग सौर कंदील जादा खरेदी केल्यामुळे रुपये 2,72,610/- चे शासन अनुदानाचे नाहक नुकसान झालेले आहे. सौर कंदील जादा खरेदी केल्यामुळे इतर योजनेचा इतर लाभार्थ्यांना लाभ घेता आले नाही, इतर लाभार्थी योजने पासुन वंचित राहीले.याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास1093/प्र.क्र.123934, दिनांक 01/09/1999 नुसार साहीत्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तिय वर्षात होणे आवश्यक असतांना सन 2016-17 मध्ये साहीत्याचे वाटप करण्यात आले होते. योजनेचा उद्देश त्या वित्तीय वर्षात सफल झाला असे म्हणता येत नाही.

7) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहित 1968 चे 50 (4) प्रमाणे लाभार्थीकडुन 10 टक्केलाभार्थी हिस्सा वसुल करुन नमुना 10 ची पावती देणे आवश्यक आहे.

8) खरेदी केलेले सौर कंदील वाटप केल्याबाबतचा अहवाल व त्या संबंधीचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र देयका सोबत आढळून आले नाही.

**3.900 इयत्ता 5 वी ते 12 वी मध्ये शिकणा-या सर्वसाधारण गटातील मुलींना 90 टक्के अनुदानावर सायकल पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर रक्कम रूपये 9,69,400/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुचना केलेल्या आहेत. व परिशिष्ट ई प्रमाणे योजना अमंलबजावणीचे वेळापत्रक नमुद करण्यात आले आहे. परंतु त्यानुसार सदर विभागानी योजनेच्या उद्दिष्ट पुर्ती साठी योग्य नियोजन केलेले नाही. त्यामुळे आर्थिक वर्षात लाभार्थीना साहित्य प्राप्त झाले नाही व योजनेचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही.

2) पुरवठा आदेशात सायकलची किंमत रुपये 3,096 + 108 + 145 + 63 + 180 + 108 = रुपये 3,700/- सुटे भागासह नमुद आहे. याबाबत मुळ दरकरार तपासले असता त्यतील शेडयुल दोन मधील क्रमांक 5 नुसार ऐच्छीक सुटे भाग त्याची किंमत नमुद आहे. त्यातील क्रमांक 2 रुपये 145/- हेवीडयुटी, लगेज चार्ज कॅरीयर, मीडीयम डयुटी ऐवजी फक्त पुरूषांच्या सायकली करीता असे नमुद असतांना व पुरवठा करावयाच्या लेडीज सायकल असतांना पुरवठा आदेशात रुपये 145/- सुटे भागासाठी जास्तीचे प्रदान केलेले आहे. त्यामुळे 262 नगाकरीता रुपये 145/- दराने एकुण रुपये 37,990/- चे आवश्यक नसतांना झालेले जादा प्रदान लेखा मान्य नाही. व संबंधीताकडून वसुलपात्र आहे.

तसेच लेडीज सायकल साईड स्टॅंड पुरेसा असतांना त्या ऐवजी पुर्ण स्टॅंड लावण्याकरीता झालेले जादा प्रदान 262 नग X 108 = रुपये 28,296/- लेखा मान्य नाही व संबंधीताकडून वसुलपात्र आहे.

3) निवड यादीतील अनुक्रमांक 180 वरील लाभार्थी कु.रंजना सेवाजी दरवडे यांचा अर्ज तपासला असता ती ग्रामंपचायत पळसगाव, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली असल्याचा रहीवासी दाखला आहे. नियमानुसार जिल्हानिधी अंतर्गत फक्त गोंदिया जिल्ह्यातील लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय असतांना दुस-या जिल्ह्यातील लाभार्थ्यांना दिलेला लाभ वसुलपात्र आहे.

4) यादीतील क्रमांक 51 पुनम इंदल बिजेवार अर्नी, तालुका तिरोडा ही सन 2014-2015 मध्ये इयत्ता 12 वी मध्ये होती. तीला सन 2015-2016 मध्ये लाभ दिला तेव्हा तीचे इयत्ता 12 वी चे शिक्षण पुर्ण झालेले असेल योजना इयत्ता 5 ते 12 मध्ये शिकणा-या मुलींकरिता असतांना सदर लाभार्थीला दिलेला लाभ रुपये 3,700/- वसुलपात्र आहे.

तसेच लाभार्थी यादीतील अनुक्रमांक 198 वरिल विणाताई केवलराम वाढई सरे्रगाव/घोनाडी, तालुका देवरी अ.क्र.181 वरिल तेजस्वी गुलाब भेलावे ओवारा, तालुका देवरी, या सन 2014-15 मध्ये 10 वी मध्ये होत्या त्यांना लाभ सन 2015-16 मध्ये दिलेला आहे. त्यावेळी त्या शिकत आहेत किंवा नाही याची माहिती नसल्याने अपात्र लाभार्थ्यांना दिला असण्याची शक्यता आहे.

5) जिल्हा परिषदेतर्फे जिल्हानिधीतुन जिल्हातील ग्रामिण व दुर्गम भागातील लाभार्थ्यांना ज्यांना शाळेत जाण्यासाठी बसची सोय नाही, अशांना सायकलचा लाभ देण्यात येत असतांना नगर परिषद व नगर पंचायत या नागरी क्षेत्रातील लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय नाही. परंतु लाभार्थी यादीतील अ.क्र. 199 मेघा राजेश गुरुवर्गी ही राहणार नगर पचांयत देवरी येथील रहीवासी असतांना व देवरीतच शिकत असतांना तसेच तिच्या फार्मवर बालविकास प्रकल्प अधिकारी यांची शिफारस नसतांना दिलेला लाभ अनुज्ञेय नाही. व रुपये 3,700/- वसुल पात्र आहे.

6) सदर योजनेच्या नस्तीमधील पान क्रमांक 5 वरिल टिप्पणी नुसार सन 2014-2015 मध्ये दोन चाकी सायकलचे तीन दरकरार उपलब्ध असल्याचे नमुद आहे. तसेच विशाल सायकल प्रा.लि. लुधीयाना यांच्या सोबतच्या दरकराराच्या शेडयुल I मधील क्रमांक 17 नुसार पुन्हा दोन समांतर दरकरार असल्याचे नमुद आहे. असे असतांना तीनही दरकरारातील दराची तुलना न करता मे विशाल सायकल प्रा.ली.लुधीयाना यांचा कोणत्या आधारावर पुरवठा आदेश दिला याचा बोध होत नाही.

7) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार पोच पावतीवर साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद करणे आवश्यक असतांना प्रकल्प गोंदिया-I, तिरोडा, आमगाव, गोरेगाव, सालेकसा व सडक अर्जुनी येथील प्रकल्प अधिका-यांनी पुरवठाधारकाला लाभ पोहचविण्यासाठी साहित्य प्राप्तीचा दिनांक नमुद केलेला नाही. व त्याशिवाय देयकाचे शोधन करावयाचे नसतांना देयकाचे शोधन केलेले आहे.

8) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार 6 आठवड्याच्या आत साहित्याचा पुरवठा प्राप्त होणे अपेक्षित असतांना प्रकल्प गोंदिया II यांना दिनांक 06/05/2015 ला प्रकल्प अर्जुनी / मोरगांव दिनांक 18/04/2015 व दिनांक 06/05/2015 ला व प्रकल्प देवरी दिनांक 24/04/2015 ला साहित्य प्राप्त झाल्याचे दिसुन येते. परंतु दंडात्मक कार्यवाही पासुन वाचण्यासाठी साहित्य प्राप्तीच्या दिनांकास खोडतोड करुन 4 थ्या व 5 व्या महिन्याला 3 रा महिना केलेला आहे. उदारणार्थ दिनांक 06/05/2015 ला 06/03/2015 केले आहे. परंतु पुरवठा पोच पावतीचा (DM) साहित्य पुरविण्याचा दिनांक 27/03/2015 असतांना त्यापुर्वीच साहित्य प्राप्त कसे काय होईल याचा अर्थ दंडात्मक कार्यवाही पासुन वाचण्यासाठी प्राप्तीच्या दिनांकात खोडतोड केला आहे. याबाबत जबाबदार व्यक्तीवर योग्य दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

9) 7 लाभार्थ्यांना अर्जासोबत संबंधीत बालविकास प्रकल्प अधिकारी यांची शिफारस नसतांना व उत्पन्नाचा दाखला नसतांना लाभ दिलेला आहे. अनुक्रमांक 186 व 187 कु. तारा व अर्चना मधुकर वाढई रोपा या एकाच व्यक्तीच्या दोन्ही मुलींस लाभ दिलेला आहे. एकाच घरात दोन लाभ देणे अनुज्ञेय नाही व वसुलपात्र आहे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 83(1) व 9(3) नुसार प्राप्त साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त केला नाही. तसेच प्राप्त साहित्याचा दर्जा योग्य असल्याबाबत व साहित्य सुव्यवस्थीत प्राप्त झाल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र प्राप्त केले नसतांना देयकाचे प्रदान केलेले आहे.

11) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

12) लाभार्थीकडुन व प्रकल्पांकडुन उपयोगीता प्रमाणपत्र ठेवलेले नाही.

**3.901 90 टकके अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर रक्कम रूपये 5,83,746/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर तरतुद वित्तीय वर्ष 2014-2015 करिता होती परंतु सन 2014-2015 मध्ये योजना राबविली नाही. व सन 2015-16 मध्ये खर्च करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाच्या

योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुचना केलेल्या आहेत. व परिशिष्ट ई प्रमाणे योजना अमंलबजावणीचे वेळापत्रक नमुद करण्यात आले आहे. परंतु त्यानुसार सदर विभागानी योजनेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी योग्य नियोजन केलेले नाही. त्यामुळे आर्थिक वर्षात लाभार्थींना साहित्य प्राप्त झाले नाही व योजनेचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार दरकरारात नमुद केल्याप्रमाणे 6 आठवडयाच्या आत साहित्य पुरवठा करणे आवश्यक असतांना खाली नमुद प्रकल्पांना उशिरा पुरवठा करूनसुध्दा पुरवठादाराला दरकरारात नमूद केल्या प्रमाणे दंड आकारणी केलेली नाही.

प्रकल्प तिरोडा, सडक अर्जुनी व देवरी यांचे कडून प्राप्त पोहोच पाववतीवर साहित्य प्राप्तीच्या दिनांकात खोडाखोड केलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीच्या दिनांकाची पडताळणी करण्याकरीता साठा पुस्तक सादर केल्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 05, दिनांक 17/04/2017 अन्वये मागणी करुनही प्रकल्प स्तरावरील साठापुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. त्यावरुन पुरवठाधारकाला लाभ पोहचविण्याच्या उद्देशाने उशिरा प्राप्त साहित्याच्या दिनांकाला खोडतोड करुन दंड वसुल केलेला नाही.

3) पुरवठा आदेशानुसार लक्ष्मी ब्रॉड (टाईप-2) शिलाई मशिनचा पुरवठा करावयाचा असतांना प्रकल्पाकडून प्राप्त पोहचपावतीवर व पुरवठाधारकाकडून प्राप्त बिल क्रमांक 160, दिनांक 01/04/2015 नुसार लक्ष्मी ब्रॉड पीकोफॉल मशिन पुरवठा केल्याचे दिसुन येते. शिलाई मशिन ऐवजी पीकोफॉल मशिन का पुरवठा करण्यात आले याबाबत कारण स्पष्ट झाले नाही.

4) योजना राबवितांना नियमानुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुल करुन नंतर पुरवठा आदेश देवून खरेदी करणे आवश्यक असतांना 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुल न करता योजना राबवीली आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 83(1) व 9(3) नुसार प्राप्त साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त केला नाही. तसेच प्राप्त साहित्याचा दर्जा योग्य असल्याबाबत व साहित्य सुव्यवस्थित प्राप्त झाल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र प्राप्त केले नसतांना देयकाचे प्रदान केलेले आहे.

6) लाभार्थी निवड यादीतील निवडक लाभार्थ्यांचे अर्ज तपासले असता त्यात अनियमितता आढळल्याने त्यांना दिलेला लाभ मान्य नाही.

7) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) लाभार्थीकडुन व प्रकल्पांकडुन उपयोगिता प्रमाणपत्र ठेवलेले नाही.

**3.902 ग्रामीण भागातील इयत्ता 7 वी ते 10 वी पास महिला / मुलीना संगणक प्रशिक्षण देणे योजनेतील अनियमितता व झालेले जादा प्रदान हस्तांतरण निधी तरतूद असताना खर्च अभिकरण निधीतून दर्शविणे.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 613, दिनांक 31/01/2016 रुपये 5,60,000/- प्रती लाभार्ती रुपये 3,500/- नुसार 160 लाभार्त्यांसाठी प्रशिक्षण संस्थाना प्रदान (विशेष घटक योजना) व प्रमाणक क्रमांक 614, दिनांक 31/01/2016 रुपये 4,48,000/- प्रती लाभार्ती रुपये 3,500/- नुसार 128 लाभार्त्यांसाठी प्रशिक्षण संस्थाना प्रदान (जनजाती क्षेत्र उपयोजना) सदर प्रमाणकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण समिती, विशेष घटक योजना तसेच जनजाती क्षेत्र उपयोजना याअंतर्गत हस्तांतरित योजनेतून प्राप्त झालेल्या शासन निधीतून 2235-3266 तसेच 2235-2397 या लेखाशिर्शातर्गत खर्च दर्शविणे अनिवार्य असताना उपरोक्त प्रमाणकान्वये अभिकरण योजनेतून खर्च केलेला आहे. निधी बदलाबाबत योग्य खुलासा करावा.

2) शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्र.76/पं.स.1, दिनांक 24/01/2014 नुसार सन 2014-15 या वित्तीय वर्षात शासन निर्णयातील बाब क्र.4 अन्वये इयत्ता 7 वी ते 12 वी पास महिला / मुलीना 3 महिने कालावधीचे संगणक प्रशिक्षण देणेसाठी एम.के.सी.एल.प्रमाणित संस्थाना माहे जानेवारी 2015 ते माहे मार्च 2015 या ब्याचसाठी योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्ती निवड समितीमार्फत केलेली असताना प्रत्यक्ष योजनानिधी त्यावर्षात

अखर्चित ठेऊन सन 2015-16 मध्ये खर्च करने म्हणजे शासन निधी अडकवून ठेवण्याचा हेतू स्पष्ट होतो. याबाबत योग्य खुलासा करावा.

3) संस्था निवड व लाभार्ती निवड प्रक्रिया माहे जानेवारी 2015 चे बॅचसाठी पूर्ण झालेली असताना योजनेची अंमलबजावणी विहित मुदतीत केली असती तर प्रती लाभार्ती रुपये 3,350/- प्रमाणे 288 लाभार्थ्यांसाठी रुपये 9,64,800/- निधी खर्च झाला असता. मात्र प्रस्ताव तपासणी केली असता माहे फेब्रुवारी 2016 चे बॅचसाठी नवीन प्रती लाभार्ती शुल्क रुपये 3,500/- प्रमाणे पूर्वीच्याच 288 लाभार्त्यांसाठी रुपये 10,08,000/- प्रदान केल्याने शासन निधी रुपये 43,200/- जादा प्रदान करावा लागल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करून वसुली होणे आवश्यक आहे.

**3.903 100 टक्के अनूदानावर लेडीज सायकल पुरवठा व वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 563, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 20,77,657/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थीच्या दृष्टीने लाभस्वरुपाची कोणतीही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तुंची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीच्या निवडीची प्रक्रिया, योजनेची सर्व गावांत प्रसिध्दी देवून ग्रामसभेच्या शिफारशीने आलेल्या अर्जातून विहीत निकषानूसार निवड करुन कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट इ नुसार जिल्हा परिषदकडील वैयक्तीक लाभाच्या योजना 30 एप्रील ते 30 नोंव्हेंबर पर्यंत कारवाई करुन साहित्य वाटप करुन 31 जानेवारी पर्यंत पूरवठादाराचे देयक अदा करावयाचे आहे परंतू अशाप्रकारे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्र.क्र.1571/34, दिनांक 16/11/1996 व शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परीच्छेद क्रमांक 7 नुसार लाभार्थी निवडी बाबत कृती कार्यक्रम ठरावावयाचा असतो. वरील मुद्द्यात नमूद केल्याप्रमाणे लाभार्थीच्या वर्षनिहाय तपशीलवार नोंदवहया तयार करणे आवश्यक असते. परंतू तसे केल्याचे लेखापरीक्षणात आढळून येत नाही.

4) पुरवठा आदेशातील अट क्रं. 5 नुसार साहित्याचे कंपनी वॉरंटी कार्ड साहित्यासोबत जोडणे आवश्यक असतांना वॉरंटी कार्ड जोडल्याची खात्री होत नाही.

5) पुरवठा आदेशातील अट क्रं. 8 नुसार शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील 4.6(क) नूसार रुपये 10,000/- अनामत रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची 1 वर्षाचे कालावधीची बँक गॅरंटी किंवा धनाकर्ष उपलब्ध् करुन दयावा लागेल. असे असतांना अशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/सीआर/-1074/57, दिनांक 27/07/1983 नुसार सायकलचा पुरवठा वितरीत केल्यानंतर उद्दिष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे / फलश्रृती अहवाल नस्तीसोबत दिसुन आले नाही.

**3.904 ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 883, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 4,98,960/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट इ नुसार जिल्हा परिषदकडील वैयक्तीक लाभाच्या योजना 30 एप्रील ते 30 नोंव्हेंबर पर्यंत कारवाई करुन साहित्य वाटप करुन 31 जानेवारी पर्यंत पूरवठादाराचे देयक अदा करावयाचे आहे परंतू अशाप्रकारे कार्यवाही केलेली नाही.

2) पुरवठा आदेशातील अट क्रं. 11 नुसार पुरवठादाराने एकूण रक्कमेच्या 3 टक्के रक्कमेची 2 वर्ष कालावधीची राष्ट्रीयकृत बँकेची परफॉर्मन्स बँक गॅरंटी दयावी लागेल असे असतांना बँक गॅरंटी दिलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सी.आर/1633/197, दिनांक 19/01/1995 नुसार लाभार्थ्यांकडुन लोक वर्गणीची रक्कम वसुल केल्या शिवाय खरेदी करु नये असे निर्देश आहे परंतू लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये 55,440/- वसूल केल्याबाबत लाभार्थांच्या पावत्या/कागदपत्रे नस्तीसोबत दिसून आले नाही. पर्यायाने लाभार्थी हिस्सा वसुल करण्यापुर्वी सदर साहित्य खरेदी करण्यांत आल्याचे दिसून येते.

4) लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना 10 मधील पावत्या पंचायत समितीने लाभार्थ्यांना देऊन तशी नोंद रजिस्टरला घेणे आवश्यक आहे. व त्यानुसार रजिस्टरची छायांकीत प्रत जिल्हा परिषदेला सादर करणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

5) मुख्य कार्यकारी अधीकारी यांचे एकत्रीत पुरवठा आदेश क्रमांक 26,08/01/2015 अट क्रमांक 14 नुसार बीलावर साहीत्याची मुळ किंमत व विक्रीकर दर्शवीणे आवश्यक आहे. परंतू मे.वर्धमान चंद्रपूर यांनी दिलेले बिल त्याप्रमाणे नसताना मंजुर केलेले आहे.

6) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधीनियम 2002 च्या शेड्रूल्ड सी नुसार सौर कंदिल या साहीत्यावर मुल्यवर्धीत कर साहीत्य कीमतीच्या 5टक्के प्रमाणे रूपये 24,948/- वसूल करून संबंधीत लेखाशीर्षात जमा करावे.

7) आयकर अधीनियम 1961 चे कलम 194 सी नुसार आयकर दीलेल्या प्रदान रक्कमेच्या 2 टक्के प्रमाणे रूपये 9,979/- वसूल करून संबंधीत लेखाशीर्षात जमा करावे.

8) साहित्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बील अदायगी करने आवश्यक असताना शासकीय यंत्रणेकडून साहीत्याचा टेस्ट रिपोर्ट घेतलेला नाही.

9) विभागाने आपले स्तरावर मास्टर नोंदवही न ठेवणे ही बाब योग्य वाटत नाही. मास्टर नोंदवही विभागाकडे नसल्याने चालु लेखापरीक्षणांत मागील वर्षात दिलेल्या लाभाची लाभार्थ्यांची पडताळणी करता येत नसल्याने दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही. सबब कृषी विभागाने अशी मास्टर नोंदवही ठेवुन प्रत्येक वर्षीच्या योजनानिहाय मागील 5 वर्षाचे दिलेल्या लाभाच्या अनुषंगाने मास्टर नोंदवही ठेवुन सादर करण्यात यावी. जेणेकरुन दुबार लाभाचे प्रकरण नसल्याची खात्री पटवावी.

10) विहीत कालावधीत प्रत्येक पंचायत समितीनिहाय साहीत्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समीतीचे साठापुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

### 3.905 संगणक प्रशिक्षण (MS-CIT) खर्च प्रदानातील अनियमितता.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 2714, दिनांक 31/03/2016, रक्कम रुपये 6,33,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बालविकास प्रकल्प अधिकारी (सर्व) यांचे मार्फत योजना राबविली जाईल व योजनेवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद गडचिरोली यांचे प्रशासकीय निमंत्रण राहील असे अटी व शर्ती मध्ये नमुद असतांना व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याचे विहीत नमुन्याची प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना नस्ती संकलन नाही.

2) प्रशिक्षण केंन्द्रनिहाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकाचे नावाची यादी नस्ती आढळलेली नाही.

3) प्रशिक्षण कालावधी 45 दिवस तथा 120 तासिकेत होणे बंधनकारक होते. प्रशिक्षणार्थीचे माहेवारी उपस्थीती पत्रक मांडलेले आहे परंतु त्यावरुन 120 तासिका पूर्ण असल्याचे स्पष्ट होत नाही.

4) रोजगार प्राप्ती व उत्पन्नात वाढ व्हावी हा उद्देश सफल झाल्याबाबत प्रत्यक्ष पडताळणी करुन उपयोगिता प्रमाणपत्र ठेवण्यात आलेली नाही.

5) योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशिक्षणार्थीची दुबारा लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) सदर प्रशिक्षण योजना गडचिरोली जिल्हयातील महिला लाभार्थ्यांकरीता असतांना आरमोरी प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण लाभार्थी यादीत अक्र. 11 वर कु आम्रपाली योगराज टेंभुर्णे मु. पो. कुडेसावळी, तालुका ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर (वर्ग 10 वी पास) हीला नियमबाह्य प्रवेश देऊन प्रशिक्षणावर खर्च केलेले आहे. सदरच्या नियमबाहय खर्च रक्कम रुपये 3,500/- संबंधितांकडुन वसुली होणे आवश्यक आहे.

प्रकल्प कुरखेडा अंतर्गत नोंदणी रजिस्टर मध्ये अक्र. 10 कु. करिश्मा ईश्वर बोदेले गाठेणगाव हिचा फोटो लावण्यात आलेला नाही. तसेच प्रकल्प चामोर्शी अंतर्गत अ.क्र. 22 कुमारी दुल्हन सुभाष उंदीरवाडे हिचे प्रवेश यादीत नाव नमूद नसून फोटोसुध्दा चिपकविण्यात आलेला नाही त्यामुळे संगणक प्रशिक्षण कार्यक्रमात अनियमितता झाल्याचे दिसून येते.

**3.906 महिला व मुलींना एमएससी आयटी चे प्रशिक्षण योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 27/3, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,57,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे अटी व शर्तीनुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र प्राप्त केले नाही.

2) प्रशिक्षण केंन्द्रनिहाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकाचे नावाची यादी नस्तीस उपलब्ध नाही.

3) प्रशिक्षण कालावधी 3 ते 4 तास प्रमाणे दिनांक 31/03/2016 पर्यंत 120 तासिकेत होणे बंधनकारक होते. प्रशिक्षणार्थीचे उपस्थीती पत्रकावरुन 120 तासिका पूर्ण असल्याचे स्पष्ट होत नाही.

4) रोजगार प्राप्ती व उत्पन्नात वाढ व्हावी हा उद्देश सफल झाल्याबाबत प्रत्यक्ष पडताळणी करुन उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेली नाही.

5) योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशिक्षणार्थीनुसार दुबारा लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) प्रकल्प धानोरा अंतर्गत अक्र. 12 कु. सरिता शिवराम ते (13) कु. करीश्मा कालीदास मडावी हया विदयार्थीनींनी इयत्ता 10 वी शिकत असुन माहे फरवरी 2016 मध्ये बोर्डाची परिक्षण असल्याचे निश्चित असून प्रस्ताव सादर केले. त्यामुळे सदर विद्यार्थीनी दिनांक 11/02/2016 ते 29/02/2016 ते 15/03/2016 या कालावधीत प्रशिक्षणात उपस्थिती दर्शविल्या आहेत. संबंधितांचे 120 तासिकेचे प्रशिक्षण पूर्ण न झाल्यामुळे त्याचवेळीत खर्च व्यर्थ असुन वसुली होणे आवश्यक आहे.

अनु.क्र. 34, माधुरी दिलीप गावंडे ते रुपाली वासुदेव गेडाम धानोरा यांची शैक्षणीक पात्रता नमुद नाही. सदरच्या प्रशिक्षणार्थी माहिला वय वर्षे 25 ते 38 वयोगटातील असल्यामुळे कोटेही नोकरी करत नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केले नाही. ओटी प्रकल्प अंतर्गत लाभार्थीतची शैक्षणीक पात्रता नमुद नाही. प्रकल्प देसाईगंज अंतर्गत प्रशिक्षण करीता सर्व 32 ही लाभार्थी कुरखेडा तालुक्यातील असून प्रकल्पाबाहेरील महिला व मुलींची यादी नियमबाहयरित्या मंजुर करुन प्रकल्पाअंतर्गत माहिला व मुलींना वंचीत ठेवलेले आहे.

**3.907 90 टक्के अनुदानावर आधारित शिलाई मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत रक्कम रुपये 19,58,283/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9 दि.20/06/2008 नुसार योजना कशा पध्दतीने राबवावी, ते वेळापत्रक दिले आहे. प्रत्यक्षात सन 2014-2015 ची तरतूद त्याच वित्तीय वर्षात न वापरता पुढील कालावधीत योजना राबविण्यात आली. दिनांक 31/03/2015 पर्यंत वाटप होणे गरजेचे असतांना विलंबाने वाटप करण्यात आले. वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

2) डिलीव्हरी चलनचे अवलोकन केले असता दिनांक 22/04/2015 नंतर पुरवठा करण्यात आला. प्रत्यक्षात दिनांक 31/03/2015 पर्यंत वाटप होणे आवश्यक होते. तालुका स्तरावरील वाटप नोंदवहीची तपासणी करता दिनांक

31/03/2016 अखेर गंगापूर पंचायत समिती स्तरावर 2 नग वाटप बाकी होते. तसेच पंचायत समिती, सिल्लोड स्तरावर 154 शिलाई मशिन पुरवठा करण्यात आला. मात्र वाटप पहावयास मिळाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1000/प्र.क्र.14/सेवा-4 दिनांक 12/02/2000 नुसार खरेदीबाबत 15 फेब्रुवारी नंतर खरेदीचे आदेश देऊ नयेत. मात्र विभागाने दिनांक 13/03/2015 रोजी पुरवठा आदेश दिले आहेत. त्यामुळे नियमाचे उल्लंघन झाले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर-1074/ 57, दिनांक 29/07/1993 अन्वये योजनेचे उदिदष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**3.908 अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रंमाक जिपनि/2000/2157/26, दिनांक 12/05/2000 अन्वये विभागाने नियमितपणे प्रत्येक वर्षी अनुदान निर्धारण करुन घेणे आवश्यक आहे. विभागाने कोणत्या वर्षापर्यंत अनुदान निर्धारण केले आहेत? विभागास शासनाकडुन कोणकोणत्या वर्षात कशासाठी अनुदाने प्राप्त झाली आहेत? ट्रेझरी मधुन, जिल्हा परिषदेकडुन कोणत्या वर्षात कशासाठी रक्क्मा प्राप्त झाल्या आहेत? त्या संपुर्ण खर्च झाल्या आहेत काय? याबाबत अनुदान निर्धारण न केल्यामुळे खात्री करता आली नाही. तरी आता सन 2014-2015 पर्यंत अनुदान निर्धारण करुन अखर्चित रक्कमा शासन खाती भरणा करुन अनुपालन सादर करावे.

**3.909 लिहीण्याचा हिरवा फळा खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 30,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद उपकरातुन रुपये 20.00 लक्ष तरतुद साहीत्य खरेदीसाठी करण्यांत आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्तप्रमाणे चटाई खरेदीसाठी रुपये 20.00 लक्ष प्रशासकीय मान्यता दिली व हिरवा फळा खरेदीसाठी 20.00 लक्ष प्रशासकीय मान्यता दिली. असे एकूण 40.00 लक्ष प्रशासकीय मान्यता दिली. चटई खरेदीसाठी देण्यांत आलेली प्रशासकीय मान्यता रदद न करता हिरवा फळा खरेदीसाठी पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिल्याने तरतुदीपेक्षा दुप्पट रक्कमेच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता दिल्याचे सिध्द होते. जी अत्यंत गंभीर बाब आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 13 अन्वये उपकरातुन शैक्षणीक व बौद्धिक विकासाला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी घेणेबाबतच्या सुचना देण्यांत आलेल्या आहे. विभागाने लहान मुलांसाठी खेळणी खरेदी करणे आवश्यक असतांना हिरवा फळाची खरेदी का केली? याबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

3) रक्कम रुपये 20.00 लक्ष तरतुदीतून 271 नग 1,200 X 1,800 MM दर रूपये 7,007.80/- प्रति नग प्रमाणे खरेदी केली व रक्कम रुपये 10.00 लक्ष तरतुदीतून 900 X 1,200 MM दर रूपये 3,956/- प्रमाणे 252 नग खरेदी केले. अंगणवाडीसाठी जर 900 X 1,200 MM चा फळा आवश्यक होता, तर 1,200 X 1,800 MM ची खरेदी का करण्यांत आली? 900 X 1,200 MM चे एकूण 1,475 बोर्ड खरेदी होऊ शकले असते. म्हणजे 70 टक्के अंगणवाडयांना याचा लाभ मिळाला असता.

4) शासनाचा दर करार उपलब्ध असतांना विभागाने दुस-या वेळेस खरेदी करताना खाजगी कंपनी (धनलक्ष्मी असोसिएट) यांना पुरवठा आदेश का दिले? याबाबत बोध होत नाही.

5) जिल्हा परीषदेने पुरवठादारास ज्या स्पेसिफीकेशनचे आदेश दिले, त्याप्रमाणे मालाचा पुरवठा झाला, याबाबतची खात्री करण्यासाठी प्राप्त झालेल्या साहीत्यामधून तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

**3.910 जिल्हा परिषद उपकर व विशेष घटक योजना अंतर्गत केंद्रासाठी ओटीएसपी अंगणवाडी केंद्रासाठी ड्युअल डेस्क खरेदी योजनेतील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2, 3 व 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 31,29,880/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी संचिकेची तपासणी केली असता याबाबत विविध लेखाशिर्षांतर्गत एकाच साहित्याची खरेदी करणेबाबत प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

2) ऑनलाइन प्राप्त निविदा दिनांक 11/01/2016 रोजी दुपारी 3 वाजता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात उघडण्यात येतील, असे ऑनलाईन निविदेमधील अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात आले. परंतु, दिनांक 28/12/2015 रोजी 1) कल्पवृक्ष एंटरप्रायजेस, औरंगाबाद 2) शिवलीला एंटरप्रायजेस, औरंगाबाद 3) भवानी एंटरप्रायजेस या तीन पुरवठाधारकांनी खालीलप्रमाणे हरकतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र दिले:-

अ) ई-निविदेमध्ये ड्युल डेक्स बद्दलचे स्पेसिफिकेशन आकृती व मोजमापे दिले नाहीत.

ब) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 प्रमाणे वृत्तपत्रात जाहीरात दिली नाही.

क) निविदेमध्ये सेलटॅक्स, व्हॅट, शॉप ॲक्ट लायसन्स या बाबीकडे दुर्लक्ष केल्याबाबत नमुद आहे.

वास्तविक पाहता वरील हरकती येण्यापुर्वीच विभागाने नियमाशी सुसंगत अशी परीपुर्ण निविदा प्रस्तुत करणे आवश्यक होते. तथापि, विभागाने या बाबी विचारात घेतल्या नाहीत. त्यानंतर ही संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली व नव्याने निविदा मागविण्यात आल्या. ही बाब कालापव्यय करणारी ठरते.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील क्रमांक 4.4.2 मधील अट क्रमांक 3 नुसार खुल्या निविदेतील अंदाजित खर्च रूपये 25 लक्ष ते 5 कोटी पर्यंतची खरेदीची जाहीरात एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, निविदा ऑनलाईन केल्यानंतर दिनांक 04/01/2016 रोजी दै. संध्यानंद व साप्ताहीक पार्श्वभुमी या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) प्रमाणक क्रमांक 24, दिनांक 04/02/2016 रूपये 29,541/- नुसार ड्युल डेस्कची नमुना तपासणी करणेसाठी सेंट्रल इन्स्टीट्युट, औरंगाबाद यांना प्रत्येकी 9847 X 3= रूपये 29,541/- एवढे तपासणी शुल्काबाबत खर्च नोंदविण्यात आला आहे. परंतु, प्रत्यक्षात नमुना तपासणीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( बालकल्याण) यांचे पत्र जा.क्र. जिप/ बाक/ आस्था/740/2016, दिनांक 16/05/2016 रोजी संबंधित शासकीय तपासणी संस्था सेंट्रल इन्स्टीट्युट, औरंगाबाद यांना पत्र देण्यात आले व त्यांनतर संबंधित संस्थेचे परीक्षण रिपोर्ट दिनांक 09/06/2016 रोजी प्राप्त झाले आहे. सदर खरेदीचे प्रदान माहे मार्च2016 मध्ये झाले असल्याने तपासणीपुर्वीच पुरवठादारास प्रदान केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वस्तुची दर्जा व योग्यता पडताळणी लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) नुसार झालेबाबत दिसुन येत नाही.

5) परभणी जिल्हयामधील एकुण अकरा प्रकल्पातंर्गत मंजुर अंगणवाडी केंद्र संख्या 1580 व मिनी अंगणवाडी संख्या 112 असे एकुण 1692 अंगणवाड्या आहेत. साहित्य खरेदी करण्यापुर्वी संबंधित सर्व अंगणवाड्यांची मागणी संचिकेमध्ये दिसुन आली नाही. त्यामुळे मागणी नसतांना साहीत्य खरेदी केल्याचे दिसुन येते.

6) जिल्ह्यामध्ये 1) गंगाखेड 2) पाथरी 3) परभणी-1 4) परभणी-2 5) जिंतुर -1 6) जिंतुर -2 7) पालम 8) पुर्णा 9) सेलु 10) मानवत 11) सोनपेठ या प्रकल्पाअंतर्गत एकुण 1692 अंगणवाड्या आहेत. खरेदी केलेले ड्युल डेक्स प्रत्येक तालुक्यामध्ये वाटप करणे अपेक्षित असतांना पालम तालुक्यामध्ये एकाही अंगणवाडीमध्ये ड्युल डेक्स देण्यात आलेला नाही. याबाबत कारण स्पष्ट होणे आवश्यक वाटते.

7) पुरवठा केलेले ड्युल डेक्स संबंधित अंगणवाडी केंद्राच्या जडसंग्रह नोंदवहीमध्ये साहीत्याची नोंद घेतलेबाबत पान क्रमांक व दिनांक उपमुख्य कार्यकारी अधिकारी( महिला व बालकल्याण) यांनी प्रमाणित केलेले आहे. परंतु, प्रत्यक्षात संबंधित अंगणवाडीची साठा नोंदवही लेखापरीक्षणात प्रमाणित करण्यासाठी उपलब्ध झाली नाही.

8) प्रत्येक अंगणवाडीला प्राप्त झालेले साहीत्याचे उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेत संलग्न केलेले दिसुन आले नाही.

9) करारनामा मधील अटी व शर्ती क्रमांक 12 नुसार पुरवठादारास उपरोक्त देयकाप्रमाणे 90 टक्के देयकाची रक्कम अदा केली व कपात केलेली 10 टक्के रक्कम त्याच दिनांकास संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक असतांना दिनांक 30/06/2016 रोजी संबंधित खात्यामध्ये रक्कम जमा केली आहे. विलंबाने भरणा केलेबाबत योग्य ते कारण स्पष्ट होणे योग्य वाटते.

**3.911 महिला व बालकल्याण समिती सदस्यांच्या अभ्यास दौरा खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,99,600/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अभ्यास दौरा प्रसिध्दीकरणामध्ये ठिकाण जिल्हा परिषद, सोलापुर, रायगड, पुणे ग्रामपंचायत हिवरेबाजार, ग्रामपंचायत राळेगणसिध्दी येथे आयोजित केला आहे. परंतु, प्रत्यक्ष दौरा सिध्दटेक, मोरगाव, महाड, राजणगाव येथे केल्याचे दिसुन येते.

2) लॉजींग भाडे पावतीवर खाडाखोड केलेली दिसुन येते. रक्कम प्राप्त पावती संचिकेत दिसुन येत नाही.

3) साई केटरर्स परभणी यांचे उपप्रमाणक क्रमांक 128 दिनांक 15/01/2015 वर मालकाची स्वाक्षरी व रक्कम प्राप्त पावती दिसुन आली नाही.

4) प्रवासासाठी साखरे टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांचे शासनमान्य वाहतुक परवाना वाहन मालकी कागदपत्रे दिसुन आली नाही. ट्रॅव्हल्स बस नेमकी किती आसनी होती? याचा उल्लेख कुठेही नाही. बस 70 आसनी असल्याचे दिसुन येत नाही. मालकाची बीलावर स्वाक्षरी व रक्कम प्राप्त पावती संचिकेत संलग्न केलेली नाही.

**3.912 जिल्हा परिषद उपकरातून महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणेकरीता नोंदविलेल्या खर्चामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,21,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनसाठी सदरील योजना राबवायची आहे. उपरोक्त तिनही स्वयंसेवी संस्थांना राज्य महिला आयोगाची सहमती असलेबाबत परिपूर्ण अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शवून पुर्तता करावी.

2) वसमत तालुक्यातील स्वयंसेवी संस्थेस (संतोषीमाता महिला मंडळ, आरळ, तालुका वसमत) हिंगोली येथे तर औंढा येथील स्वयंसेवी संस्थेस (पुजा महिला विकास संस्था, पुरजळ तालुका औढा) वसमत येथे समुपदेशनाचे काम देण्याबाबत खुलासा करावा.

3) संबंधित स्वयंसेवी संस्थेस कार्यरत विधी सल्लागार तसेच समुपदेशन यांचेकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असलेबाबतची वैध कागदपत्रे / प्रमाणपत्रे संचिकेत आढळून आली नाही. तिनही संस्थाकडे कार्यरत विधी सल्लागार व समुपदेशक योग्य त्या शैक्षणिक पात्रतेचे व वैध असलेबाबत अभिलेख्याद्वारे खात्री पटवावी.

4) संबंधित संस्थांनी मुख्यत: संतोषीमाता महिला मंडळ यांनी सरासरी दरमहा प्राप्त 5 तक्रारींचे संदर्भात फक्त नोटीस देण्याची कार्यवाही केल्याचे दिसले. बरीच न्यायालयीन प्रकरणे संस्थांनी हाताळल्याचे दिसले. प्राप्त तक्रारी बाबत केवळ कोर्टात केस चालू आहे, असा शेरा संस्थांनी दिला आहे. म्हणजे केवळ संख्यात्मक केसेस दर्शविल्याचे दिसते.

5) सदरील संस्थांना मानधन अदा करतांना दरमहा किती प्रकरणे निकाली काढणे बंधनकारक आहे? याचा तपशिल योजनेच्या प्रारूप आराखडयात नमूद नाही.

6) समुपदेशन केंद्रास मान्यता देणे व त्याकरीता उपकरातून निधी खर्च करणे, याची फलनिष्पत्ती काय झाली? याबाबत अहवालाद्वारे पूर्तता करावी.

7) सदरील केंद्रांना प्रत्येक महिन्यास जिल्हा परिषदेच्या बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी कामकाजाबाबत विस्तृत अहवाल देणे आवश्यक होते.

8) सदरील संस्थांचे सनदी लेखापाल यांचे लेखापरीक्षण अहवाल विभागाने अनुदान वितरीत करताना प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

**3.913 विशेष घटक योजने अंतर्गत ग्रामिण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत रक्कम रूपये 13,81,905/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1076/प्र.क्र.872/जल-2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती वस्तुंची / साहित्याची आवश्यकता आहे? याची एकत्रितरीत्या मागणीचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक होते. परंतू, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशा-1020/प्र.क्र.114/38 दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी, यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी सर्वसधारण सभेत लाभार्थ्यांची निवड करावयास हवी. परंतू, अशा प्रकारची लाभार्थ्याची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश कशाचे आधारे दिला? याचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95 दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे वस्तुची / साहित्याची खरेदीपुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया निकषानुसार परिपूर्ण होईल, याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच परिच्छेद क्रमांक 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक होते. साहित्याचे वाटप यथावकाश करणे ही अनियमितताच आहे. वित्तीय वर्ष अखेर साहित्य विनावाटप पडून असल्याने रक्कम विनाकारण गुंतून पडली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/ प्र.क्र.1239/ 34 दिनांक 01/09/1993 आणि शासन निर्णय क्रमांक मागास/1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे विवरणपत्र अ मध्ये जाती व गावनिहाय याद्या तयार केल्या पाहिजे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे दोनदा लाभ झाला नसल्याची पूर्ण खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2001/ प्र.क्र.132/पंस7(26), दिनांक 05/09/2002 नुसार दर करार अस्तित्वात नसतांना निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यापुर्वी उद्योग संचालनालय मध्यवर्ती भांडार संघटनेकडून दरकरार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरूपात खात्री करून घ्यावी. नंतरच पुढील कार्यवाही करावी अशी खात्री केल्याचे नमूद नाही.

6) वैयक्तीक लाभाच्या योजनेचा लाभ देतांना संबंधित लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय सेवेत नसणे आवश्यक असते. उक्त तपासणी केलेल्या प्रस्तावात शासकीय / निमशासकीय सेवेत नसलेबाबत प्रमाणपत्र जोडले नव्हते.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57 दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतू सफल होत आहे किंवा नाही? याबाबत सविस्तर अहवाल संचिकेत दिसून आला नाही. त्यामूळे योजनेचा उददेश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

8) संबंतिध पंचायत समित्यांच्या साठा नोंदवही परिपूर्ण नाहीत.

**3.914 90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,77,440/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जसलंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडीपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त, दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद केल्यानुसार व परिशिष्ट "ई" मध्ये नमुद केल्यानुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

2) या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या एकुण 144 संच (नग) शिलाई मशीनचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्याचे आदेश पुरवठा दारास देण्यात आले असून डिलीवरी चलान नुसार 16 पंचायत समित्यांना पुरवठा करण्यात आल्याचे दिसून येते.

किनवट 06 नग, हदगाव 12 नग, मुखेड 07 नग, देगलूर 10 नग, बिलोली 10 नग, कंधार 10 नग, भोकर 04 नग, नांदेड 25 नग, लोहा 16 नग, नायगाव 09 नग, उमरी 03 नग, मुदखेड 05 नग, हिमायतनगर 09 नग, धर्माबाद 03 नग व अर्धापूर 12 नग, माहूर 03 नग.

त्यापैकी 6 पंचायत समित्यांकडील साठा नोंदवह्या दर्शविण्यात आल्या असून उर्वरीत पंचायत समितीच्या नोंदवह्या लेखापरीक्षणात सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे साठा व विनियोगाची खात्री पटू शकली नाही.

3) साहित्य वाटपाअभावी पडून असल्याने योजनेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही.

4) पंचायत समिती मुदखेड, नायगाव, अर्धापूर व हिमायतनगर यांनी लाभार्थी हिस्सा विलंबाने भरणा केल्याचे दिसून येते.

5) एकाच लाभार्थ्यास, शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसले बाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**3.915 90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,77,440/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जसलंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडीपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त, दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद केल्यानुसार व परिशिष्ट "ई" मध्ये नमुद केल्यानुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

2) या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या एकुण 144 संच (नग) शिलाई मशीनचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्याचे आदेश पुरवठादारास देण्यात आले असून डिलीवरी चलान नुसार खालीलप्रमाणे पुरवठा करण्यात आल्याचे दिसून येते.

किनवट 96 नग माहूर 48 नग.

वरीलपैकी पंचायत समिती किनवट कडील साठा नोंदवही दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे साठा व विनियोगाची खात्री पटू शकली नाही.

3) एकाच लाभार्थ्यास, शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसले बाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**3.916 शासन हस्तांतरीत योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना सौरकंदिल पूरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** महिला व बालकल्याण विकास विभागांतर्गत शासन हस्तांतरीत योजनेंतर्गत ग्रामीन भागातील महिलांना सोंरकंदिल पूरवठा करण्यासाठी प्रमाणक क्रमांक 42, दिनांक 05/02/2016 अन्वये रक्कम रुपये 4,94,856/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक झेड्पीए-2008/प्रक-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्याच्या वैयक्तिक लाभाच्या योजनासाठीचे वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही.

2) सदर योजनेच्या लाभार्थी निवडीबाबतीचे प्रस्तावास दिनांक 02/03/2015, दिनांक 08/10/2015 व दिनांक 02/11/2015 रोजीच्या विषय समिती सभेमध्ये लाभार्थी निवड करण्यात आली व पुरवठा आदेश दिनांक 26/03/2015 रोजी देण्यात आला. लाभार्थी हिस्सा जमा करुन पूरवठा आदेश देणे आवश्यक आहे. परंतू, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. अद्यापही लाभार्थी हिस्सा जमा होणे बाकी आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मागास/1008/प्रक.78/34, दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थी साहित्य वाटपाबाबत मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अद्ययावत नोंदवही ठेवून् पूर्तता दर्शावावी.

4) मे. अक्षय ज्योती एंटरप्रायजेस प्रायवेट लिमीटेड यांचे पत्र क्रमांक AJEPL/Letter/2015-16/A536, दिनांक 05/03/2016 अन्वये 10 टक्के लोकवाटा रूपये 1,09,968/- जमा करण्यात आला नाही. शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील मुददा क्रमांक 16 प्रत्येक लाभार्थीचा 10 टक्के सहभाग घेण्यात यावा. जमा होणारे लाभार्थी हिस्सामधून वस्तू साहित्य करता येईल. उपरोक्त बाबींचे उल्लंघन झालेले आहे.

5) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांचे पत्र क्रमांक जि.प.ऊ/मवबावि/लेखा-2/1611/2016 दिनांक 18/07/2016 पत्रानुसार 232 पैकी 51 म्हणजेच 22 टक्के सौरकंदील खराब झाल्याचे कळविले आहे. सदर नादुरुस्त सौर कंदीलाबाबत यापुढे पाठपुरावा केल्याचे आढळुन आले नाही.

**3.917 ग्रामीण भागातील महिलांना सौंदर्य प्रसाधने प्रशिक्षणातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषद उपकर अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना प्रमाणक क्रमांक 30, दिनांक 08/02/2016 अन्वये रक्कम रुपये 3,74,814/- खर्च करुन सौदर्य प्रसादने प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-09, दिनांक 20/06/2008 मधील परिच्छेद क्रमांक 3 अन्वये योजनेची अंमलबजावणी विशिष्ट कालावधीत केली असती तर जसे की, जिल्हा परीषद स्तरावर योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा मंजूर करणे, लाभार्थी निवड, यादीस मान्यता देणे इत्यादी बाबीस जो कालावधी दिलेला आहे, त्या कालावधीमध्ये या सर्व बाबी पार पाडल्या असत्या, तर सन 2014-2015 या वर्षात राबविण्यात आलेल्या योजनावर त्याच अर्थिक वर्षात खर्च झाला असता. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर-1074/57 दिनांक 29/07/1993 अन्वये योजनेचे उददीष्ट सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु, उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

3) लाभार्थ्यास प्रशिक्षण शुल्काच्या 10 टक्के लोकवाटा जमा करुन योजना राबविणेबाबत निर्देश असताना प्रशिक्षण कालावधीपूर्वी लाभार्थी हिस्सा वसूल करण्यात आला नाही. त्यामुळे लाभार्थी हिस्सा किती जमा झाला? याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाहीत.

4) प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थी नोंदवही ठेवण्यात आल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाहीत.

5) प्रशिक्षण देणा-या संस्थेने प्रशिक्षणाच्या केंद्रनिहाय स्वतंत्र उपस्थिती पत्रक ठेवण्यात येऊन संबंधीताच्या नांवासमोर संबंधीत लाभार्थीची दररोज स्वाक्षरी घेण्यात यावी. सदर उपस्थिती पत्रक बालविकास प्रकल्प अधिकारी

यांचे स्वाक्षरीने प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. परंतु, त्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाहीत.

**3.918 ग्रामीण भागातील महिलाना शिलाई यंत्र पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 10/06/2015 ठराव क्रमांक 151 नुसार जिल्हा परिषद उपकर अंतर्गत अर्थसंकल्पात रक्कम रुपये 10 लक्ष एवढी तरतुद ठेऊन ग्रामीण भागातील महिलाना शिलाई यंत्र पुरवठा करणेसाठी दर कराराद्वारे 286 नग 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 9,98,426/- एवढा खर्च करुन प्रकल्प स्तरावर वाटप करण्यात आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) प्रमाणे पुरवठा साहित्याचा दर्जा व गुणवत्ता विभागध्याक्ष तपासुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र नोंदविलेले नसताना देयके पारीत केलेली आहेत.

2) सदर खरेदी ही शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे नियम 146 अन्वये करारनामा करणे आवश्यक असतांना तसे न करतांच शिलाईयंत्र खरेदी करण्यात आले आहेत.

3) पुरवठा आदेशातील अट क्र. 5 नुसार दोन आठवड्याच्या आत पुरवठा करावयाचे आदेश असतांना पुरवठा आदेश दिनांक 30/06/2015 चा असून डिलिव्हरी चलनावर शिलाईयंत्र पुरवठा दिनांक दिनांक 05/08/2015 नमुद केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे शिलाई यंत्र पुरवठा विहीत मुदतीत प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. नियमानुसार विलंब कालावधीचा दंड आकारण्यात आला नाही, त्यामुळे रक्कम रुपये 14,976/- इतका दंड वसूल करून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1098/ प्र.क्र.78/34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही तयार करुन वर्षेनिहाय दिलेल्या लाभार्थी नोंद गावनिहाय, तालुकानिहाय नोंदी घेवून संबंधीतास दुबार लाभ न दिल्या बाबतची खात्री करणे आवश्यक आहे. परंतु मास्टर नोंदवही न ठेवल्याने दुबार प्रदानाची खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2006/प्र.क्र.4871/वित्त/3, दिनांक 18/10/2006 नुसार व प्रशासकीय मान्यता अट क्र.1 प्रमाणे प्राप्त झालेल्या 10 टक्के महिला व बालकल्याणसाठी राखीव असलेल्या निधीच्या रक्कमेतून 3 टक्के रक्कम अपंगासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावी. अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अनुशेषात वाढ होत आहे.

6) बालविकास प्रकल्पाधिकारी यांनी प्राप्त झालेले सर्व शिलाई यंत्र अंगणवाडी केंद्राना वाटप करुण त्याचा विनियोग करून त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र महिला व बालविकास विभाग कार्यालयास सादर करावे असे नमुद असतांना उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध झाले नाही.

7) साठा नोंवहीत नोंद घेतल्याचे साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक देयकावर नमुद नसताना देयक पारीत केलेली आहेत खुलासा व्हावा.

8) साहित्याची खरेदी महिला व बालकल्याण विभागाकडुन झालेली असल्यामुळे साहित्याची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 81(1) नुसार विभागाच्या साठा नोंदवहीत घेवुन साहित्य खरेदी निविदेतील अटी व शर्ती नुसार प्राप्त झाल्याची खात्री करुन नंतरच साहित्याचे वाटप लाभार्थींना झाले पाहिजे. परंतु विभागाने अशी कार्यवाही न करता साहित्य पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्यात आल्याचे दिसुन येते. याबाबत समर्थनिय खुलासा व्हावा.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 मधील क्र.16 मध्ये नमुद केल्याप्रमाणे योग्य लाभार्थी मिळविण्यासाठी पुरेशी व व्यापक प्रसिध्दी देवुन

प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील पात्र महिलाना प्रथमत: लाभ देवुन योजनेत दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास रुपये 50,000/- प्रर्यत वार्षीक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थीना महिला व बाल समितीच्या मान्यतेने या योजनेचा लाभ देण्यात यावा. तथापि लाभार्थी निवड विहित नमुन्यातील अर्ज प्रस्ताव याबाबी लेखापरिक्षणात उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे योग्य लाभार्थीस लाभ प्राप्त झाल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही. यामुळे योजनेचे उद्देश व फलश्रुती निष्पन्न झाल्याचे दिसुन येत नाही. पुर्तता दर्शवावी.

10) उपरोक्त तपशिलाप्रमाणे तलुकास्तरीय 14 प्रकल्पांना 286 शिलाई यंत्राचा पुरवठा केलेला असुन 18 शिलाईयंत्र प्रकल्प स्तरावर शिल्लक आहेत. लेखापरिक्षण कालावधीत 18 नग वाटपाविना पडुन आहे. त्यामुळे अनावश्यक खरेदी केल्याचे स्पष्ट होते, म्हणुन योजनेचे उद्देश सफ़ल झाल्याचे दिसुन येत नाही.

11) प्रत्यक्ष लोकवाटा रक्कम रुपये 3,491 X 286 नग = रुपये 9,98,426 X 10 टक्के रुपये 99,842/- जमा नाही. म्हणजेच लोकवाटा जमा होण्यापूर्वीच प्रदान केले आहे.

**3.919 ग्रामीण भागातील महिला मुलीना एम.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षण देण्यासाठी पूरक पुस्तक छपाई करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर चे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी जिल्हा परिषद उपकर अंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता 10 वी, 12 वी उतीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी महिला व बालकल्याण समिती जिल्हा परिषद लातूर यांचा ठराव क्रमांक 154, दिनांक 07/07/2015 विषय क्रमांक 4 जिल्हा परिषद उपकर अंतर्गत जिल्हा परिषद अंदाजपत्रकीय तरतूद रुपये 15 लक्ष मधून एम.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षणा सोबत पूर्व प्राथमिक मराठी व इंग्रजी माध्यमातील प्रशिक्षण देण्यासाठी पुस्तक छपाई करणे व प्रकल्प स्तरावर वाटप करणे पोटी 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,50,000/- चा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मूळ संचिका दिनांक 02/09/2015 च्या सादर टिप्पणी अन्वये पुस्तक खरेदीसाठी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये मान्यता प्रदान करणेबाबत अभिप्राय नमूद आहेत. परंतु सदर शासन निर्णयामध्ये पुस्तक खरेदीबाबत कोणताही उल्लेख नमूद केला नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयाचा आधार घेवून केलेली खरेदी प्रक्रिया नियमबाह्य ठरते सदर पुस्तकाचे अवलोकन केले असता सदर पुस्तिका ह्या पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी छपाई केल्या आहेत. जे की एम.एस.सी.आय.टी.प्रशिक्षणाशी दुरान्वेही संबधीत नाही. त्यामुळे सदरची खरेदी ही नियमबाह्य ठरते.

2) सदरचा संपूर्ण खर्च हा 'संगणक प्रशिक्षण पूरक पुस्तिका खरेदी करणे' या शिर्षकाखाली करण्यात आलेला असून खरेदी मात्र पूर्व प्राथमिक दर्जाच्या पुस्तिकाची करण्यात आलेली आहे जे कि नियमबाह्य आहे. सदर खरेदीसाठी सुधारीत तरतूद करून सुधारीत प्रशासकीय /तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. नियमबाह्यते बाबत खुलासा व्हावा.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप क्रमांक 2 नुसार जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करण्यात यावा. तथापि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केल्याचे संचिकेत दिसून आले नाही. ज्याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/(2512) उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील 8.3 (अ) नुसार निविदा प्रसिध्द झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवड्याचा कालावधी देणे आवश्यक असताना कमी कालावधीत निविदा मागविण्यात आली आहे.

5) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/(2512) उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील 8.3 (ह) मधील परिशिष्ट 7 मधील मार्गदर्शक तत्वे नुसार पुर्नप्रत्ययी आदेशा बाबत कार्यवाही अनुसरली नाही. ज्याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

6) पुर्नप्रत्ययी पुरवठा आदेशामधील अट क्र.2 नुसार पुस्तिकेचा पुरवठा आदेश मिळाल्या पासून आठ दिवसात करावा अन्यथा निविदेतील अटी शर्तीनुसार दंड आकारण्यात येईल पुर्नप्रत्ययी पुरवठा आदेश दिनांक 09/10/2015 रोजीचे आहेत. आठ दिवस म्हणजेच पुस्तिका पुरवठा दिनांक 17/10/2015 पर्यंत होणे आवश्यक असताना राहुल कॉम्पुटर्स नांदेड याचे बिल नंबर 86 दिनांक 19/10/2015 रोजीचे आहे यावरून असे दिसून येते कि सदरील पुस्तिका 2 दिवस विलंबाने पुरवठा केल्याचे दिसून येते व महिला बालकल्याण विभागाने विलंबाबाबत दंडाची कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. ज्याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

7) मागणी केल्यानुसार पुरवठादारांकडून प्राप्त पुस्तके 3300 नग व 1700 नगाची नोंद साठा नोंदवही पान क्र.51 वर घेवून प्रकल्पस्तरावर पुस्तक वाटप केल्याचे साठा नोंदवही पान क्र.51 दर्शविले आहे. छपाई केलेले पुस्तक प्रकल्प स्तरावर वाटप केलेले आहे. उपरोक्त प्रकल्पस्तराचे पुस्तके प्राप्त व पुस्तके प्रशिक्षणार्थींना वाटप केल्याबाबत साठा नोंदवह्या लेखापरीक्षणात दर्शविण्यात आल्या नाही. त्यामुळे पुस्तके प्राप्त व पुस्तके वाटपाबाबत खात्री करता आली नाही.

8) प्रशासकीय मान्यता मधील अट क्रमांक 2 व 4 नुसार सदरील पुस्तिका ही माहितीसह प्रकल्प स्तरावरून प्रशिक्षणार्थींना वाटप करणे बंधनकारक राहील. प्रकल्प स्तरावरून किती प्रशिक्षणार्थींना माहितीसह पुस्तिका वाटप केल्याबाबत खात्री करता आली नाही. वाटपाबाबत खात्री पटवावी.